cmyk

दैनिक राज्य **लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१५ | गुरूवार दि.२५ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शेतकरी संकटात, राजकारणी फार्मात !

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीचा काळ असल्याने सर्वच राजकीय पक्षांसह प्रशासन, यंत्रणा त्यात गर्क आहे. तर त्याचवेळी राज्यातील हजारो गावे, वाड्या, तांडे पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकतायत, टँकरची वाट पाहतायत तर तिसरीकडे अवकाळी पावसाने राज्याला विशेषत: मराठवाड्याला अक्षरश: झोडपून काढत हजारो हेक्टरवरील पिकांना, फळबागांना, भाजीपाल्याला जोरदार तडाखा दिल्याने बळिराजा पुरता उद्ध्वस्त झाला आहे. भारतीय हवामान खात्याने यंदा वेळेत व भरघोस मोसमी पावसाचा अंदाज व्यक्त केलाय खरा पण तोवरचे दोन महिने घशाला कोरड पडलेल्या राज्यातील जनतेने काढायचे कसे? हा खरा यक्ष प्रश्न आहे.

### मनीष सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत ७ मेपर्यंत वाढ

नवी दिल्ली: दिल्ली मद्य धोरण संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात आप नेते आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना बुधवारी (दि.२४) मोठा धक्का बसला. दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत ७ मे पर्यंत वाढ केली आहे. या प्रकरणातील जबाब आणि पुरावे सादर करावेत, असे निर्देशही न्यायालयाने सीबीआयला दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ मे रोजी राऊस अॅव्हेन्यू कोर्टात होणार आहे. यापूर्वी मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी न्यायालयाने सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत २६ एप्रिलपर्यंत वाढ केली होती.

# कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे बीड जिल्ह्यात पाणी आणू

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतली दै. लोकतंत्रच्या बातमीची दखल; ७ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणणार

**बीड । प्रतिनिधी**

**कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनीतून बीड जिल्ह्याला २० वर्ष झाले तरी पाणी मिळाले नाही, याबाबत दै. लोकतंत्रने दि.२१ एप्रिल रोजी पान १ वर मुख्य वृत्त प्रकाशित केले होते. याच बातमीचा धागा पकडून कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी बीडमधील जाहीर सभेत मोठी घोषणा केली. जिल्ह्यातील शेती ओलिताखाली यावी यासाठी कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनीतून ५७ टिएमसी पाणी बीड जिल्ह्यात आणण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. हे पाणी आले तर जिल्ह्यातील ७ लाख हेक्टर जमीन**



ओलिताखाली येणार असल्याचे आश्वासन कृषीमंत्री धनंजय मुंडे

### शेतकरी पुत्र तर बिगर जमीनीचा

मी शेतात काय पिकवतो हे कृषीमंत्र्यांना चांगलेच माहित आहे. त्यांनी पहाव, असे बजरंग सोनवणे म्हणाले होते. त्यांच्या उमेदवारी अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्र पाहिले तर सोनवणे हे बिगर शेतीचे शेतकरी पुत्र आहेत. त्यांची सर्व जमिन प्लॉटिंगची आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले. त्याबरोबरच त्यांच्या प्रदेशाध्यक्षांनी त्यांच्यासोबत अर्ज दाखल करायला ही जाणे टाळले. कारण त्यांना माहित होतं की हे कसे उमेदवार आहेत. त्यामुळेच की काय सोनवणे यांना मी मॅनेज उमेदवार नसल्याचे सांगण्यासाठी छत्रपतींची खोटी शपथ घ्यावी लागली, असेही ते म्हणाले.




**यांनी बीड येथील जाहीर सभेत दिले. भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या सभेत ते बोलत होते.**

यावेळी पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, जिल्ह्यातील ७ लाख ८३ हजार हेक्टर जमीन जिरायती आहे. तर अवघी १ लाख ७२ हजार हेक्टर जमीन बागायती आहे. शेतीला पाणी नसल्याने आमचे शेतकरी ऊसतोडणीला दरवर्षी बाहेर जिल्ह्यात स्थलांतर करतात. शेतीला पाणी नसल्याने आमच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्नही कमी आहे. त्यामुळे कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे उजनीतून बीड जिल्ह्यासाठी ५७ टिएमसी पाणी आणले जाणार आहे. त्यासाठी आम्ही कटिबध्द असल्याचे सांगून ते म्हणाले, ते पाणी बीड जिल्ह्यात आले तर जवळपास ७ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे आमच्या शेतीला मुबलक पाणी मिळेल. पर्यायाने ऊसतोडणीसाठी ◀◀ पान २ वर

### बजरंग बप्पानी प्रवेशाअगोदर दोन्ही कारखान्यांचा विस्तार करुन घेतला

बजरंग सोनवणे यांनी आचारसंहिता लागण्याअगोदर व त्या पक्षात प्रवेश करण्याअगोदर सोलापुर आणि केजच्या दोन्ही कारखान्यांचा राज्य सरकारकडून विस्तार करण्यास मंजुरी मिळवून घेतली. हा भवरंग सोनवणे आहे, हे ओळखून घ्या, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

### माझ्यापेक्षा प्रत्येक मतदारसंघातून २० हजाराने जास्त लिड द्या -खा.डॉ.प्रितमताई मुंडे

ही आजची सभा खर्या अर्थाने विजयाची सभा आहे. पंकजाताईंनी पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी किती विकास कामे केली हे मी सांगणे म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे आहे. मला सांगा, भारत देश जगात तिसरी महासत्ता होतोय, यासाठी नव्हे तर आमच्या लाडक्या पंकजाताईंना त्यांच्या योग्यतेच्या पदावर पुन्हा बसवण्यासाठी तुम्हाला ही निवडणूक महत्वाची वाटते हे मला चांगले माहित आहे. मला माहिती आहे, संपूर्ण राज्यभरातून आज लोकं इथे आले आहेत, त्यामुळे ही खर्या अर्थाने विजयाची सभा मी मानते. पंकजाताईंना तुम्हा सर्वांचे मतरुपी आशिर्वाद द्या, अन्? माझ्यापेक्षा जास्त विक्रमी मताधिक्याने निवडून द्या. तुमच्यापैकी कोणालाही पंकजाताईंकडे कामे घेवून



जाताना फार विनंत्या कराव्या लागल्या नाही. पंकजाताईंनी बोलावून घेत गाव विकासासाठी निधी दिला. त्यामुळे ताईंनी जे विकासाचे योगदान दिले त्याची परतफेड करण्यासाठी आपण कोणीही ◀◀ पान २ वर

# पाच वर्षांसाठी एक संधी द्या, जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधणार-पंकजाताई मुंडे

## मान्यवरांच्या उपस्थितीत दाखल केला उमेदवारी अर्ज: शहरात अभुतपुर्व रॅली

नि:स्वार्थ प्रेम करणारी जनता माझ्यासोबत आहे. जिल्ह्यातील सर्व जनता हेच माझे वैभव आहे, मात्र कांही जणांची दृष्ट याला लागते. निवडणूकीत गाफील राहू नका. मी एका पराभवाला सामोरे गेले आहे. पराभवानंतर जनतेच्या साक्षीने मी समाजकारणात राहिले.अग्निपरीक्षेत मी तावून सुलाखून निघाले, त्यानंतर आता मला संधी मिळाली आहे. ही निवडणूक अवघड आहे. मी म्हणजे गोपीनाथ मुंडे असे म्हणणार



नाही, कारण ज्या दिवशी मुंडे साहेबांच्या गळ्यात हार घालायचा होता, त्याचवेळी त्यांचेवर अंत्यसंस्कार करायची वेळ आली. त्यामुळे आपले त्यांचे अधुरे राहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी या लोकसभेत आपल्याला विजयी व्हायचे आहे. आपल्याला एकदा दूध पोळले आहे, आता ताकही फुंकून प्यायचे, म्हणून गावागावात जा, प्रचार करा, जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर घेवून जाण्यासाठी मला अधिकाधिक मताधिक्य देवून विजयी करा असे आवाहन भाजपा महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी आज येथे केले.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज आपला उमेदवारी दाखल केला. त्यानंतर पारस ग्राऊंडवर आयोजित महारॅलीचे रूपांतर विराट विजयी संकल्प सभेत झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. पालकमंत्री धनंजय मुंडे, खा. डॉ.प्रीतमताई मुंडे, आ.प्रकाश सोळंके,आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे, आ.लक्ष्मण पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ.अमरसिंह ◀◀ पान २ वर

### प्राचार्य डॉ. नंदकिशोर फुलारी यांची गळफास घेऊन आत्महत्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाजोगाई संचलित बी. एड. कॉलेजचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर फुलारी यांनी बुधवारी सायंकाळी ४:३० वाजता महाविद्यालयाच्या कार्यालयातच गळफास घेऊन आत्महत्या केली.**




सर्व कर्मचारी घरी गेल्यानंतर प्राचार्य डॉ. फुलारी यांनी ही आत्महत्या केली असल्याचे सांगण्यात येत आहे. प्राचार्य डॉ. नंदकिशोर फुलारी हे गेली अनेक वर्षांपासून या संस्थेने सुरु केलेल्या विविध शैक्षणिक युनीट मध्ये कार्यरत होते. या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून त्यांच्याकडे प्राचार्य पदांची जबाबदारी होती. प्राचार्य डॉ. नंदकिशोर फुलारी यांनी नव्यानेच बांधलेल्या घराची वास्तुशांती याच ◀◀ पान २ वर

# सरकारच्या नव्या आदेशाने शेतकऱ्यांची पंचाईत

## आता इअर टॅगिंग असेल तरच जनावरांची नुकसानभरपाई, एक जून पासून खरेदी-विक्रीही बंद

**पुणे । पतिनिधी**

**कोणत्याही पाळीव जनावरांना नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का, वन्यप्राण्यांच्या हल्ला झाल्यास त्याच्या मृत्यू पाश्चात बाधीत शेतकऱ्याला पंचनाम्यानंतर काही दिवसात शासनाकडून नुकसानभरपाई हमखास मिळायची. परंतु आता ही रक्कम मिळणे कठीण झाले आहे. सरकारच्या नव्या नियमानुसार इअर टॅगिंग (१२ अंकी बार कोडेड) असणाऱ्या जनावरांनाच नुकसानभरपाई मिळणार आहे. १ जूनपासून त्याची अंमलबजावणी होणार असून, टॅगिंग नसणाऱ्या जनावरांच्या खरेदी विक्रीलाही प्रतिबंध**



### पशुवैद्यकीय सेवा होणार बंद

जनावरांना पशुवैद्यकीय दवाखान्यातून सेवा दिली जाते. नव्या निर्णयानुसार १ जूनपासून इअर टॅगिंग नसणाऱ्या जनावरांना पशुवैद्यकीय दवाखान्यातून मिळणारी सेवा बंद होणार आहे. तसेच इअर टॅगिंग असल्याशिवाय जनावरांची परराज्यातून महाराष्ट्रात वाहतूक करता येणार नाही. त्यामुळे कर्नाटक सीमेलगत असलेल्या भागातील पशुपालकांची मोठी अडचण होणार आहे.

### टॅगिंग करण्याचे आवाहन...

इअर टॅग न मारलेल्या जनावरांच्या पशुपालकांनी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. इअर टॅगिंग व भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करून दिली जाईल. त्यासाठी पशुपालकाचा आधार क्रमांक व मोबाईल आवश्यक आहे. ही प्रक्रिया मोफत आहे.

**केला आहे. त्यामुळे इअर टॅगिंग नसणाऱ्या जनावरांचे पशुपालकांनी टॅगिंग करून घेणे आता अत्यावश्यक बनले आहे.**

केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन अंतर्गत भारत पशुधन प्रणाली सुरू केली आहे. यात जनावरांचे इअर टॅगिंग न केलेले जन्म-मृत्यू नोंदणी, प्रतिबंधात्मक ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२४ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | २,२४५ | २,९५१ | २,४४९ |
| ज्वारी/हायब्रिड : १८७.०० क्विंटल | १,५६० | ३,४५० | २,५२३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : १४.५० क्विंटल | ८,७११ | १०,६५० | ९,८४० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: २.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: ११२.०० क्विंटल | ४,३०० | ४,६०० | ४,५१८ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,४५० | ५,६३० | ५,५६० |

## ईव्हीएम-व्हीव्हीपॅट प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**सध्या देशभरात सुरु असलेल्या लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशिन्स मॅनेज करता येऊ शकते असा दावा करत यापुढे सर्व मतदारसंघात ईव्हीएम मशिन्ससोबत व्हीव्हीपॅटही ठेवावी आणि व्हीव्हीपॅट मशिन्सच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या मतदारांनी मतदान केलेल्या स्लिपही मतदानाबरोबर मोजावीत याप्रकरणी प्रशांत भूषण यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.** ◀◀ पान २ वर



### मनोज जरांगेंची तब्येत बिघडली; उपचारासाठी संभाजीनगरमधील रुग्णालयात दाखल

**संभाजीनगर । पतिनिधी**

**राज्यात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून राजकीय नेतेमंडळी प्रचारात व्यक्त आहेत. तर, मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील हे निवडणुकांच्या राजकारणापासून दूर आहेत. मात्र त्यांचे मराठा समाजाच्या गाठीभेटी आणि दौरे सुरू असून बीड जिल्ह्यात त्यांनी लक्ष केंद्रीत केले आहे.**



**बुधवारीही बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना मनोज जरांगे यांची तब्येत बिघडली. त्यामुळे, त्यांना तत्काळ बीडमधून छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले आहे.**


दौरा अर्धवट सोडून ते छत्रपती संभाजीनगर मधील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचारही सुरू करण्यात आले आहेत. गतवेळेसप्रमाणे त्यांना ◀◀ पान २ वर

# पुढील पाच दिवस राज्यात उष्ण लाटेसह अवकाळीचीही शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

**गोवा, कोकणसह राज्यातील काही भागांत शनिवार २७ आणि रविवार २८ एप्रिल रोजी उष्णतेच्या लाटेसह दमट वातावरण राहणार आहे. तसेच पुढील ४ ते ५ दिवस राज्यात मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस देखील पडण्याची शक्यता आहे. दरम्यान विदर्भातील तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची देखील शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागाने वर्तवली आहे.**

उत्तरेकडील गंगेच्या पश्चिम बंगाल, अंतर्गत कर्नाटक, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि किनारपट्टीच्या ओडिशामध्ये वेगळ्या ठिकाणी उष्ण ते गंभीर उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. दरम्यान उत्तर प्रदेश बिहार, झारखंड, कोकण आणि गोवा तसेच आंध्र



प्रदेश किनारपट्टी आणि यानम, रायलसीमा आणि तेलंगणामध्ये शनिवार (दि.२७) रविवार (दि.२८) उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत पूर्व आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारतात उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, ईशान्य भारतात काही ठिकाणी २७ आणि २८ एप्रिल रोजी गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच वायव्य भारतात देखील २६ ते २८ एप्रिल दरम्यान गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा यांसह अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

cmyk

## अग्रलेख

# शेतकरी संकटात, राजकारणी फार्मात !

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीचा काळ असल्याने सर्वच राजकीय पक्षांसह प्रशासन, यंत्रणा त्यात गर्क आहे. तर त्याचवेळी राज्यातील हजारो गावे, वाड्या, तांडे पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकतायत, टँकरची वाट पाहतायत तर तिसरीकडे अवकाळी पावसाने राज्याला विशेषत: मराठवाड्याला अक्षरश: झोडपून काढत हजारो हेक्टरवरील पिकांना, फळबागांना, भाजीपाल्याला जोरदार तडाखा दिल्याने बळिराजा पुरता उद्ध्वस्त झाला आहे. भारतीय हवामान खात्याने यंदा वेळेत व भरघोस मोसमी पावसाचा अंदाज व्यक्त केलाय खरा पण तोवरचे दोन महिने घशाला कोरड पडलेल्या राज्यातील जनतेने काढायचे कसे? हा खरा यक्ष प्रश्न आहे.

सध्याच्या घडीला राज्यात साडेपाच ते सहा हजार गावांना टँकरच्याच पाण्याचा आधार आहे. उन्हाळ्याच्या वाढत्या झळांनी प्रकल्पांमधील पाणीसाठा तळ गाठतो आहे. राज्यातील बहुतांश शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणीकपात सुरू झाली आहे. मराठवाड्यातील मोठ्या शहरांमध्ये आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होतो आहे. तर दुसरीकडे एप्रिलमध्ये मागच्या २० दिवसांतील १३ दिवस मराठवाड्याला कुठल्या ना कुठल्या भागाला अवकाळी पाऊस दणका देतो आहे. या वादळी पावसाने जिरायती, बागायत व फळबागांचे तसेच भाजीपाल्याचे आतोनात नुकसान झाले आहे. यात जिवीतहानीही झाली आहे. बीड, लातूर जिल्ह्यास अवकाळीचा सर्वात जास्त तडाखा बसला आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार आणखी चार दिवस अवकाळी पावसाचा राज्यात व मराठवाड्यात मुक्काम राहणार आहे. थोडक्यात नुकसानीच्या आकड्यांमध्ये आणखी भर पडण्याचीच शक्यता आहे. विशेष म्हणजे ज्या मराठवाड्यात सध्या लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यासाठी रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे तिथेच अवकाळी पावसाने धुमाकूळ घातलाय व याच भागात पाणीटंचाईची तीव्रताही प्रचंड वाढली आहे. मात्र, प्रचाराच्या रणधुमाळीत काही सन्माय अपवाद वगळता कुठलाही राजकीय पक्ष वा या पक्षांचे नेते अवकाळी पाणीटंचाई या सामान्य जनतेला ग्रासून टाकणाऱ्या संकटावर 'ब्र' शब्दही काढताना दिसत नाहीत. खरे तर दुष्काळ सतत पाचवीला पुजलेल्या मराठवाड्यात निवडणूक प्रचारात हाच विषय सर्वात प्राधान्याचा हवा. मात्र, तोच विषय प्रचारातून हद्दपार झालेला पहायला मिळतो आहे. त्याऐवजी वैयक्तिक उणीदुणी, चिखलफेक, धार्मिक-जातीय धुवीकरणाचे मुद्दे यांचाच प्रचारात भरणा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नांदेड व परभणी येथे जाहीर सभा झाल्या. विकसित भारताचा संकल्प करून या मुद्यावर तिसऱ्यांदा जनतेकडे सत्ता मागणारे पंतप्रधान संकटात सापडलेल्या मराठवाड्याला या संकटातून बाहेर काढण्यासाठी कोणता मदतीचा हात देतात व मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीसाठी काय उपाय योजू इच्छितात हे ऐकायला सामान्य जनता आतुर होती. मात्र, पंतप्रधान त्यावर एक शब्दही बोलले नाहीत. उलट मराठवाड्याच्या विकासाचा काँग्रेस अडसर असल्याचा आरोप करून त्यांनी मराठवाड्यातील प्रश्नांसाठी विरोधी बाकावर बसलेल्या काँग्रेसलाच जबाबदार धरले. त्यावेळी त्यांना दोन वेळच्या सत्ताप्राप्तीत मराठवाड्याने भाजपचे खासदार निवडून देऊन त्यांना बळ दिल्याचा सोयीस्कर विसर पडला. ज्या मराठवाड्याच्या जनतेला दरवर्षी उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागते, घागरभर पाण्यासाठी कडक उन्हात वणवण करावी लागते व टँकरची वाट पाहण्यातच दिवसाचा सर्वाधिक वेळ वाया घालवावा लागतो तो मराठवाडा भाजपच्या विकसित भारताच्या स्वप्नांमध्ये कसा काय रममाण होऊ शकतो? हा प्रश्नच! मोदी सरकारने २०१९ मध्ये सादर केलेल्या अर्थसंकल्पात 'हर घर जल' ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली होती. त्यानुसार २०२४ पर्यंत प्रत्येक घरात नळाने शुद्ध पाणी पुरविले जाणे अपेक्षित होते. या योजनेत सर्वाधिक नळजोडण्या बिहार, महाराष्ट्र व उत्तर प्रदेशात देण्यात आल्याचा सत्ताधाऱ्यांचा दावा आहे. जर सरकारच्या दाव्यानुसार ही योजना यशस्वी ठरली असेल तर मग आज महाराष्ट्रातील हजारो गावे टँकरच्या प्रतीक्षेत का ताटकळलेली आहेत? या प्रश्नाचे उत्तर सत्ताधारी मतदार असणाऱ्या सामान्य जनतेला देत नाहीत आणि विरोधकही मनापासून या प्रश्नाला हात घालून सरकारला जाब विचारताना दिसत नाहीत.

महाराष्ट्राच्या व विशेषत: मराठवाड्याच्या पाचवीला दुष्काळ पुजला गेला आहे. यातूनच या विषयावर 'तेरी भी चूप मेरी भी चूप' धोरण अवलंबिले जाते आणि त्याचाच प्रत्यय अवकाळी व दुष्काळ असे दुहेरी संकट एकत्र अनुभवणाऱ्या मराठवाड्याला येतो आहे. यात संकटग्रस्त जनता वाऱ्यावर सोडली गेल्याचेच चित्र आहे.

## विनोद पाटलांची लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातून माघार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी कायदेशीर लढा दिलेल्या विनोद पाटील यांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. त्यांनी आज कार्यकर्त्यांच्या बैठकीत ही घोषणा केली. लोकसभा निवडणूक न लढवता तटस्थ राहण्याची भूमिका विनोद पाटील यांनी घेतली आहे. कुणाला पाठिंबा न देता, कोणत्या पक्षासोबत न जाता आणि अपक्ष निवडणूक न लढवता तटस्थ राहिले पाहिजे,



अशी माझी भूमिका असल्याचे ते म्हणाले.

ते म्हणाले की, मी छत्रपती संभाजीनगरमधून निवडणूक लढवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांची इच्छा होती. मी निवडणूक लढवली पाहिजे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले, पण शहरातील सत्ताधारी दोन आमदार आणि एक खासदाराने मला उमेदवारी देऊ नयेत, यासाठी टोकाचा विरोध केला, असा आरोप विनोद पाटील यांनी केला. त्यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर लोकसभा लढवली पाहिजे असा आग्रह शहरवासीयांनी धरला होता. त्यामुळे निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती.

## नरेंद्र मोदींचे भाषण म्हणजे लबाडाघरचं आवताण; शरद पवार यांचा हल्लाबोल

**माढा । प्रतिनिधी**

सामान्य माणसाची महागाईतून सुटका केली नाही. १० वर्षांत स्वत: काही केले नाही, आणि हिशेब आम्हाला मागतात. मोदींनी गेल्या दहा वर्षात एकही आश्वासन पूर्ण केलं नाही. लबाडाच्या घरचे अवताण जेवल्याशिवाय खरं नाही असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला.

माढा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित जाहिर सभेत शरद पवार बोलत होते. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात स्वातंत्र्यपूर्वीचा काळ आणला आहे. आदिवासींची स्थिती खालावली आहे. मोदींनी गेल्या दहा वर्षांत फक्त महात्मा गांधी, पंतप्रधान



जवाहरलाल नेहरुंवर टीका केली. जे लोक हयात नाही, त्यांच्यावर ते टीका करतात. मात्र त्यांनी दहा वर्षात काय केले या संदर्भात काहीही बोलत नाही अशी उपरोधिक टीकाही यावेळी केली.

भाषणादरम्यान शरद पवार यांनी आपल्या मोबाईलमधून नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली दिलेल्या आश्वासनाचे जुने भाषण ऐकवले. मोदी यांचे भाषण म्हणजे लबाडाघरचे आवताण जेवल्याशिवाय राहत नाही, अशी अवस्था असल्याचा टोलाही यावेळी लगावला. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, २०१४ मध्ये मोदींनी सांगितले की, आम्ही बेरोजगारी संपवू. बेरोजगारीचे सर्वेक्षण करणाऱ्या जागतिक दर्जाची संस्था इंटरनॅशनल लेबर ऑर्गोनायझेशनने सर्वेक्षण केले त्यात भारतात बेरोजगारीचे प्रमाण वाढल्याचे सांगत आहे. पंतप्रधान मोदींनी दिलेले आश्वासन पूर्ण केले नाही. त्यांनी गेल्या दहा वर्षांत काय केले? पंतप्रधान मोदींनी दहा वर्षात नोटाबंदी केली. त्यामुळे सामान्य लोकांना कित्येक दिवस रांगेत उभे राहावे लागले. देशभरात ७०० लोकांचा बँकांच्या रांगेत उभे राहून मृत्यू झाला. बेरोजगारी वाढली, महागाई वाढली. त्यावर मात्र आता पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत नाहीत असाही आरोप त्यांनी केला.

### देश हुकूमशाहीच्या दिशेने...


पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर टीका केली म्हणून केजरीवालांना तुरुंगात टाकले. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी केंद्र सरकारवर टीका केली, तर तिथेही त्यांना तुरुंगात टाकले. इंग्रजांसारखे काम सध्या केंद्रातील सरकार करत आहे. देश हुकूमशाहीच्या दिशेने जात आहे अशी भीतीही यावेळी व्यक्त केली.

## पंकजाताई मुंडेंची बीड शहरात अभूतपूर्व महारॅली ; विजयाच्या जयघोषानं शहर दणाणलं

**बीड । प्रतिनिधी**

**फटाक्यांची आतिषबाजी, ढोल ताशांचा निनाद, फुलांचा वर्षाव, जोश, जल्लोष आणि त्याच्या जोडीला मतदारांचा सळसळता उत्साह अशा जबरदस्त वातावरणात भाजप, महायुतीच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांची आज शहरात अभूतपूर्व अशी महारॅली निघाली. रॅलीपूर्वी दुपारी २.१५ वा. पंकजाताई मुंडे यांनी महायुतीच्या प्रमुख नेत्यांसह जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.**





जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे,खा. डॉ.प्रीतमताई मुंडे, गौरव खाडे, यश:श्री मुंडे, पंकजाताईंचे चिरंजीव आर्यमान पालवे, मनसे नेते व मामा प्रकाश महाजन, आ.प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे,आ. नमिता मुंदडा, माजी आ.अमरसिंह पंडित, भीमराव धोंडे, आर.टी. देशमुख, केशवराव आंधळे, संजय दौंड, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, कुंडलिक खांडे, सचिन मुळूक, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, कल्याण आखाडे, पी. टी. चव्हाण, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, रमेश आडसकर, मोहन जगताप, वाल्मिक निकाळजे, सलीम जहांगीर, अण्णासाहेब मातकर, राजेंद्र मोटे, सुमंत धस, अनिल तुरूकमारे आदींसह महायुतीचे नेते यावेळी उपस्थित होते. अर्ज दाखल केल्यानंतर पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शहरात महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या वतीने अभूतपूर्व अशी महारॅली काढण्यात आली. शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत पंकजाताई मुंडेंनी या रॅलीत उपस्थितांचे स्वागत सत्कार आणि आशीर्वाद घेतले. ही रॅली माळीवेस, सुभाष रोड मार्गे आल्यानंतर रस्त्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज यांना पंकजाताईंनी अभिवादन केले. रॅलीत जिल्हाभरातून महायुतीचे कार्यकर्ते मोठया संख्येने उत्स्फूर्त सहभागी झाल्याचे पहायला मिळाले. ओपन वाहनातून निघालेल्या या रॅलीत पंकजाताईंनी हात उंचावून अभिवादन करत नागरिकांचे स्वागत स्विकारले. ठिकठिकाणी फुलांच्या वर्षावात त्यांचे स्वागत झाले. त्यांच्या स्वागताचे मोठमोठे बॅनर्सही शहरात झळकले होते. या उत्साहपूर्ण स्वागताबद्दल कृतज्ञता व्यक्त करत उपस्थितांना त्यांनी वंदनही केले. दरम्यान रॅली मार्गावर पंकजाताईंचे महिला भगिनींसह कार्यकर्त्यांनी पुष्पहार देऊन 'विजयीभव', 'पंकजाताई मुंडे तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', कोण आली रे आली, महाराष्ट्राची वाघिण आली, अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पंकजाताई मुंडे या आपल्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दुपारी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल झाल्यानंतर त्यांना समर्थन देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नगर रोडवर जिल्हाभरातून आलेल्या भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी हलगीच्या निनादात जल्लोष करत भारतीय जनता पक्ष आणि पंकजाताई मुंडे यांच्या समर्थनार्थ प्रचंड घोषणाबाजी केली. यावेळी भाजप, शिवसेनेसह, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे ध्वज उंचावून कार्यकर्ते नृत्यात तल्लीन झाले होते. महत्त्वाचे म्हणजे बुधवारी दुपारी तापमानात प्रचंड वाढ झालेली असतानाही कार्यकर्त्यांनी पंकजाताईंबद्दलचे आपले प्रेम तसूभरही कमी होऊ दिले नाही. पंकजाताई मुंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना बीड जिल्ह्यातील भाजप महायुतीच्या सर्व नेत्यांनी उपस्थित राहून महायुती एकसंघतेचे दर्शन घडवले. पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगराध्यक्ष, सरपंच ग्रामपंचायत सदस्यांनी उपस्थित राहून रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महत्त्वाचे आहे की, पंकजाताईंचा अर्ज दाखल करताना पुण्यातील महायुतीचे आ. सुनील शेळके, आ. माधुरी मिसाळ, आ. आश्विनी जगताप, आ. उमाताई खापरे हे चार आमदार आवर्जून उपस्थित राहिले.

## मतदार जागृतीसाठी 'सायक्लोथॉन'

**बीड । प्रतिनिधी**

**'सायकल चालवा आरोग्यासाठी, मतदान करा लोकशाहीसाठी' या उक्तीप्रमाणे रविवारी दिनांक २८ एप्रिल रोजी बीड जिल्ह्यात मतदार जागृतीसाठी सायकलिंग ('सायक्लोथॉन') हा विशेष उपक्रम मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी राबविला जाणार आहे.**



सोमवार दि.१३ मे, २०२४ रोजी ३९ बीड लोकसभा मतदार संघात मतदान होणार आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात सायकलिंग ('सायक्लोथॉन') उपक्रम राबवणार आहोत. रविवारी दिनांक २८ एप्रिल सकाळी सात वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन , जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारी या ठिकाणाहून बीड शहरातील मुख्य रस्त्यावरून किमान दहा किलोमीटर सायकल चालवून मतदारांना मतदान करण्यासाठी जागरुकता निर्माण केली जाईल. या सायकल फेरीमध्ये बीडमधील मतदार नागरिक स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊ शकतात. पांढरा टी-शर्ट व काळी पॅन्ट घालून या मॅरेथॉनचा हिस्सा होऊन 'मी मतदान करणार असा संदेश मतदारांनी द्यावा', असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यावेळी केले. मुद्रित तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारांनी, माध्यमकर्मीनीही या सायक्लोथॉनमध्ये सहभाग नोंदवून मतदारांना मतदानासाठी जागरुक करावे, अशी अपेक्षा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी व्यक्त केली आहे. या सायकल रॅलीमध्ये बीड जिल्ह्यातील लॉयन्स क्लब, रोटरी क्लब, पोलीस, महिला, जिल्हा परिषद तथा महसूल सायकल संघटनेचे सदस्य मोठया संख्येने सहभागी होतील.

## पान १वरून...

### कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाद्वारे

जाणाऱ्यांची संख्या कमी होवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. पंकजाताई यांना आपण संधी दिली तर त्या केंद्रात गेल्यावर आम्ही दोघेही या प्रकल्पासाठी पोटतिडकीने काम करु असे आश्वासन धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले.

-----------

### पाच वर्षांसाठी एक संधी द्या, जिल्ह्याचा .

पंडीत यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, कुंडलिक खांडे, यश:श्री मुंडे, अक्षय मुंदडा, योखेश क्षीरसागर आदींसह महायुतीच्या घटकपक्षांचे नेते, जिल्हाप्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. आजची ही सभा पंकजाताई मुंडे यांच्या विजयाची नांदी आहे. पंकजाताई केवळ खासदार म्हणून निवडून येणार नाही तर केंद्रीय मंत्री होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सत्तेत असताना पंकजाताईंनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे काम केले. त्यामुळे या निवडणूकीत जाती-पातीचे राजकारण करणार्यांना उत्तर देवून विकासाच्या मुद्यावर आपल्या सर्वांना पंकजाताईंना निवडून द्यायचे आहे असे आवाहन त्यांनी केले. सभेच्या प्रारंभी बाळासाहेब दोडतले, कल्याण आखाडे, मनसे जिल्हाध्यक्ष सुमत धस, प्रा.पी.टी.चव्हाण,सलीम जहाँगीर, अनिल जगताप, अनिल तुरुकमारे, विजयसिंह पंडीत, माजी आ.भीमराव धोंडे, रमेश आडसकर, आ.बाळासाहेब आजवे, आ.लक्ष्मण पवार, आ. प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, खा.डॉ. प्रितम मुंडे यांची समयोचित भाषणे झाली. याप्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,माझा बाप भरल्या ताटावरुन गेला, तेव्हा तुम्ही सर्व जनता सर्व माझे आधार झालात. त्यामुळेच तुम्ही मला प्रिय आहेत. माझ्यावर खूप लोकांचे स्वप्न साकारण्याची जबाबदारी होती. धनंजय मुंडेंनी आता स्पष्ट करुन टाकलयं की, जिल्ह्याचा अन्? घरातला पालक म्हणून पंकजाताईंच्या विजयाची जबाबदारी घेतली हे खूप आनंददायी आहे. मी पालकमंत्री असताना विकासाच्या शक्य होईल त्या प्रत्येक योजना अनेक ठिकाणी मंजूर केल्या. शासनाकडून विकासांचा कोट्यावधी रुपयांचा निधी जिल्ह्याच्या विकासासाठी आणला. माझी नियती स्पष्ट आहे, मन कलुषित नाही, त्यामुळे मागच्या निवडणूकीत आवाहन केल्यानंतर जनतेने प्रितमताईला प्रचंड मते दिली होती. आता माझ्यासाठी मते मागत आहे, मला शेवटची संधी द्या, सर्व जाती-धर्माच्या समाज बांधवांना माझे आवाहन आहे, मला पैसे कमवायचे नाहीत की, प्रसिध्दी मिळवायची नाही तर केवळ जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे.

**रमेश आडसकरांनी गाजवले भाषण!**

यावेळी भाजप नेते रमेश आडसकरांनी आपल्या भाषणात मविआचे उमेदवार बजरंग सोनवणेंवर शेलक्या शब्दात टिका केली. 'समोरच्या उमेदवाराला माझे सांगणे आहे,वेळ गेलेली नाही, अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. कारण मी, आ.सुरेश धस यांनीही लोकसभा निवडणूक मुंडे साहेबांविरुध्द लढलो, आमचा निभाव लागला नाही. तरीही बजरंग सोनवणेंना हे का कळलं नाही' असे सांगत जुन्या राष्ट्रवादीने मुद्दाम त्यांना उमेदवारी दिली असा उपरोधिक टोलाही रमेश आडसकरांनी लगावला. आडसकरांच्या या भाषणा उपस्थितांनी प्रचंड टाळ्या देत प्रतिसाद दिला.

**आ.बाळासाहेब आजबे**

महायुती भक्कमपणे बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी आहे. पंकजाताई मुंडे या दिल्लीत जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करताना जिल्हा विकासाच्या उंचीवर नेवून ठेवतील हा विश्वास सर्वांना आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेने आरक्षणाच्या मुद्यावरुन विरोधकांकडून केला जात असलेला बुध्दीभेद ओळखावा. वास्तविक राज्य सरकारने मराठा समाजाला विधानसभेत विशेष अधिवेशन घेवून १० टक्के आरक्षण दिलेले आहे. ते आरक्षण न्यायालयातसुध्दा टिकावे यासाठी अभ्यासू अहवालही तयार केलेला आहे. म्हणून मराठा समाजानेही विरोधकांच्या चूकीच्या भूलथापांना बळी न पडता पंकजाताईंना बीड जिल्ह्याचे खासदार म्हणून विक्रमी मताधिक्य द्यावे.

**लक्ष्मण पवार**

जिल्ह्यातील जनता सुज्ञ आहे. त्यांना आपला विकास कोण करु शकते, हे चांगले माहित आहे. त्यामुळे पंकजाताईंना प्रचंड मताधिक्क्याने निवडून देण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मेहनत घेवून येत्या १३ तारखेला पंकजाताईंना विजयी करत दिल्लीत संसदेत बीड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करायला पाठवावे असे आवाहन गेवराई मतदार संघाचे आ.लक्ष्मण पवार यांनी केले.

**आ.प्रकाश सोळंके**

जिल्हा विकसित करण्यासाठी, तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी आपल्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना सर्व जिल्ह्यातील मतदारांनी मतदान करुन विजयी करावे. आपण इतके दिवस एकमेकांच्या विरोधात निवडणूका लढवल्या, मात्र आता आपली महायुती झाली आहे. त्यामुळे ही निवडणूक एकतर्फी जिंकून देत पंकजाताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. भविष्यातील काही मिळायचे असेल तर ते महायुतीतूनच मिळेल त्यामुळे आपल्या राजकीय महत्वाकांक्षेला आवर घाला. संपूर्ण देशातून पंकजाताई मुंडे सर्वाधिक मताधिक्क्याने निवडून येतील. बीड जिल्ह्यात, ब्राह्मण, वाणी,तेली समाजाचे उमेदवार खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. म्हणजेच जिल्ह्यात अजूनही जातीपातीच्या राजकारणाला थारा मिळालेला नाही हे लक्षात घेवून जनतेने मतदान करावे असे आवाहन आ.प्रकाश सोळंके यांनी केले.

**आ.सुरेश धस**

आ.प्रकादादा आता पुढचा काहीच विचार करायचा नाही. यापुढे आता या महायुतीतील कोण कोणत्या चिन्हावर लढेल हे काहीच आता सांगता येत नाही. इतकी सारी राजकीय स्थिती बदललेली आहे असे सांगत आ.सुरेश धस यांनी उपस्थितांमध्ये चांगलाच हशा पिकवला. उद्या जे व्हायचं ते होईल पण आता मात्र आपल्या सर्वांना पंकजाताईंना एकदिलाने निवडून आणायचे आहे. अब की बार चारसो पार असे भाजपने सांगितल्यानंतर काँग्रेस व त्यांच्या मित्रपक्षाने अबकी बार पाचसो पार असे म्हणावं, मात्र त्यांची अवस्था केविलवाणी झालेली आहे, मात्र आम्ही चारसो पार म्हटलं की, विरोधक मुस्लिम समाजात सीएएवरुन चूकीचे गैरसमज पसरवतात. संविधान बदलणार म्हणून आमच्या विरोधात चूकीचे वक्तव्य ते करतात. मात्र घटना कोणीच बदलू शकत नाही. आमच्या विरोधकांना जनता चांगले ओळखते. वास्तविक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व घटकांचा विकास केला. गरिबांना न्याय दिला आहे हे सांगताना आ.धस यांनी महाविकास आघाडी सरकारने अभिनेत्री कंगणा राणावत, केंद्रिय मंत्री नारायण राणे, टीव्ही पत्रकारांचा सत्तेचा गैरवापर करुन केलेला छळ उपस्थितांसमोर मांडला. दोन हॉर्वेस्टरचे मालक शेतकरी पुत्र कसे? असा सवाल करत त्यांनी बजरंग सोनवणेंवर टिका केली. भाजप सरकारमध्ये मंत्री असताना पंकजाताईंनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून केलेली रस्त्यांची कामे, तांड्यापर्यंत दिलेल्या सुविधा, महिला व मुलींच्या कल्याणाच्या राबवलेल्या योजना अन्? मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी राबवलेल्या योजनांचा आढावा घेत विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करुन संसदेत पाठवण्याचे आवाहन केले.

----------------

### सरकारचा नव्या आदेशान

लसीकरण, औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण आदी न नोंदी ठेवल्याने संबंधित जनावराची सर्व माहिती उपलब्ध होत आहे. संभाव्य साथीच्या रोगाचे अंदाज व त्यावरील उपाययोजनांचे नियोजन करणे, उत्पादनातील वाढीसाठी इअर टॅगिंग बंधनकारक केले आहे. दरम्यान, पशुसंवर्धन विभागाने इअर टॅगिंगबाबत कडक धोरण अवलंबल्याचे दिसून येत आहे. १ जूनपासून इअर टॅगिंग आणि त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर असल्याशिवाय पशुधनाची खरेदी विक्री करता येणार नाही. तसेच यापूर्वी नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जनावरांचा मृत्यू झाला तर सरसकट नुकसानभरपाई मिळत होती; पण आता मृत्यू झालेल्या जनावराला इअर टॅगिंग असेल तरच नुकसानभरपाई मिळणार आहे. त्यामुळे पशुपालकांनी टॅगिंग नसलेल्या जनावरांचे टॅगिंग करून घेणे आवश्यक आहे; अन्यथा नुकसानभरपाईवर पाणी सोडावे लागणार आहे.

--------------

### प्राचार्य डॉ. नंदकिशोर फुलारी

महिन्यात ६ तारखेला झाली होती. पोलिसांनी माहिती मिळताच घटनास्थळाचा पंचनामा करून प्रेत शवविच्छेदन अहवालासाठी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात हलवले. या अहवालानंतर व पोलीस तपासात प्राचार्य डॉ. नंदकिशोर फुलारी यांच्या आत्महत्येचे कारण समजेल. दरम्यान, अंबाजोगाईच्या शिक्षण क्षेत्रात या घटनेन हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

---------------

### माझ्यापेक्षा प्रत्येक मतदारसंघातून २०

कमी पडू नये. हे तेच मैदान आहे जिथे २०१९ मध्ये मी भाषण केले होते. मात्र मी कोणावरही टिका करत नाही. २०१९ ला साहेबांच्या बारकीला तुम्ही विजयी केले. आता या निवडणूकीत तुम्ही साहेबांच्या मोठीला मोठ्या मताधिक्याने विजयी करा. दिग्गज नेते आपल्या सोबत आहेत. त्यामुळे प्रत्येक विधानसभा मतदार संघातून २० हजारांची जरी वाढीव मताधिक्य दिले तर आपल्या पंकजाताई ५ लाखांच्या मताधिक्क्याने सहज विजयी होतील असा विश्वासही खा.प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केला.

----------------

### मनोज जरांगेंची तब्येत बिघडली;

अशक्तपणा आला असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, यापूर्वीही जरांगे पाटील यांना अस्वस्थ वाटत असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मनोज जरागे यांनी आपल्या गावभेटी दौऱ्यादरम्यान थेट भाजपा नेत्यांवर हल्लाबोल केला आहे. तर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही लक्ष्य केल्याचे दिसून आले आहे. काही दिवसांपूर्वी बीडमधील भाजपा उमेदवार पंकजा मुंडे आणि मनोज जरांगे यांच्यात आरोप-प्रत्यारोप झाल्याची चर्चा माध्यमांत रंगली होती. त्यावेळी, मी मनोज जरांगेंवर टीका केली नसल्याचेही पंकजा मुंडेंनी स्पष्ट केले होते. वर्षभरात मी मनोज जरांगे पाटलांचे नाव देखील घेतले नाही. मला ज्याच्यावर बोलायचे आहे मी त्याच्यावर मोठ्या आवाजात बोलते आणि मी जर टीका केली तर कधीच शब्द मागे घेत नाही, मी गोपीनाथ मुंडेंची औलाद आहे. गरिबांसाठी आंदोलन करणाऱ्या जरांगे पाटलावर मी टीका केली नाही. अशा त्या म्हणाल्या होत्या.

------------

### ईव्हीएम-व्हीव्हीपॅट प्रकरणी सर्वोच्च

त्यावर पहिली सुनावणी घेतल्यानंतर दुसरी सुनावणी बुधवारी पार पडली. यावेळी केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या २४ एप्रिल रोजीच्या इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन्स (ईव्हीएम) आणि व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपॅट) मधील उत्पादकांनी स्वतंत्रपणे प्रोग्राम केलेल्या मायक्रोकंट्रोलर्सना ''अज्ञेयवादी'' म्हटले, कारण ते राजकीय पक्ष किंवा उमेदवार ओळखत नाहीत तर मतदारांनी दाबलेली बटणेच ओळखतात. युनिट्सच्या फ्लॅश मेमरीमध्ये सॉफ्टवेअर नसून चिन्हे जतन करण्यात आली होती, असा खुलासा भारतीय निवडणूक आयोगाने सादरीकरणाच्या माध्यमातून न्यायालयात केला. ईव्हीएम प्रणाली अपारदर्शक आणि हेराफेरी होण्याची शक्यता असल्याचा दावा करणाऱ्या याचिकांचे प्रकरण हाताळताना न्यायमूर्ती खन्ना आणि दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने १८ एप्रिल रोजी हा खटला निकालासाठी राखून ठेवला होता, २६ एप्रिल रोजी लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान होत असतानाच ही घटना घडली. परंतु बुधवारी पुन्हा एका असामान्य हालचालीत, सर्वोच्च निवडणूक आयोगाने अधिक प्रश्नांसह बैठक घेतली. सकाळच्या सत्रात खंडपीठाने ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीच्या सुरक्षा आणि कार्यात्मक पैलूंबद्दल ईसीआयसाठी असलेल्या विशिष्ट प्रश्नांचे वाचन खुल्या न्यायालयात केले. दुपारच्या जेवणानंतर, उपनिवडणूक आयुक्त नितेश कुमार व्यास न्यायालयाच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी प्रत्यक्ष हजर झाले, ज्यांची संख्या अगदी पाच होती.

cmyk

## आखाडेंना निवडणूका आल्याकी ओबीसीचा पुळका येतो! -रासवे

बीड : ओबीसी समाजावर संकट आलेल्या असताना तोंडातून 'ब्र' शब्द न काढणाऱ्या कल्याण आखाडेना निवडणुका आल्या की ओबीसीचे पुढारपण करण्यासाठी वेळ भेटतो. ओबीसी समाजाचे प्रश्न विद्यार्थ्यांच्या अडचणी नोकरदारांच्या समस्या या विषयी पुढारपण करण्यासाठी आखडेंना वेळ नसतो. केवळ प्रदेशाचे पद घेऊन निवडणुका आल्या की फुशारकीने मिळविणाऱ्या कल्याण आखाडे यांना ओबीसीचे पुढारपण करण्याचा कसलाही अधिकार नाही असे प्रतिपादन संतोष रासवे यांनी केले आहे. याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, ओबीसी समाजावर अतिक्रमण करू पाहणाऱ्या समाजाने ओबीसी समाजास वेठीस धरले होते. तेव्हा कल्याण आखाडे कोणत्या बिळात जाऊन बसले होते ते त्यांनाच माहिती. ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, ओबीसी समाजाचे आरक्षण, महाज्योती विषयीचे प्रश्न, ओबीसी समाजातील नोकरदारांचे प्रश्न आधी विविध प्रश्न समाजासमोर असताना कल्याण आखाडे यांनी कधी साधा मोर्चा देखील काढला नाही. कोणतेही आंदोलन केले नाही. फक्त राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी प्रदेशाध्यक्ष पद घेऊन स्वतःचा फायदा बघण्याचा खटाटोप केला. आता निवडणुका आल्या की गुप्त बैठका घेऊन माझ्यासोबत किती ओबीसी समाज आहे हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न कल्याण आखाडे यांनी सुरू केला आहे. बैठका मेळावे घ्यायचे तर खुलेआम घ्यावेत. प्रत्येकाला फोन करून तुम्ही बैठकीला या सोबत कोणाला आणू नका, ही गुप्त बैठक आहे. असे सांगून बैठकीला बोलावून घेणाऱ्या कल्याण आखाडे यांनी जाहीर बैठक घेऊन पाठिंबा दर्शवावा. लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे आणि बीडचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी पाच वर्ष बिळात लपून बसणाऱ्या आणि निवडणुका आल्या की स्वतःच्या स्वार्थासाठी गुप्त बैठका घेणाऱ्या कल्याण आखाडे यांच्यापासून सावध राहावे. या बैठकांचा निवडणुकीत फायदा होणार नसून नुकसानच होणार आहे. याची दखल मुंडे बंधू-भगिनींनी घ्यावी. असा सल्लाही संतोष रासवे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. २५ एप्रिल २०२४



## नारायणगडला इश्वरांपासूनची धार्मिक परंपरा -जोशी महाराज

बीड । प्रतिनिधी

धार्मिक व वारकरी संप्रदायात वेगवेगळे पंथ आहेत, या पंथातील आद्य नारायणा पासुनची परंपरा ही श्री क्षेत्र नारायण गडला असल्याचे प्रतिपादन अमृताश्रम महाराज जोशी यांनी केले. ते, सिरसमार्ग येथील नारळी सप्ताहात हरी कीर्तनात बोलत होते. यावेळी महंत शिवाजी महाराज यांच्यासह संतमहंत उपस्थित होते.

सिरसमार्ग येथे सुरु असलेल्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहात सोमवारी दुसरे कीर्तन पुष्प गुंफताना बोलत होते. यावेळी कीर्तनाचे निरुपण करताना अमृताश्रम महाराज यांनी नारायण गडची धार्मिक परंपरा विषद केली. अमृताश्रम महाराज म्हणाले आद्य नारायण, ब्रम्हदेवापासून ही परंपरा पैठण येथील संत एकनाथ महाराज पीठ ते नारायण गड पर्यंत असल्याचे ते म्हणाले. यावेळी कीर्तनात बोलताना धार्मिक क्षेत्रातील सर्व पंथ व त्यांची परंपरही जोशी महाराज यांनी व्यक्त केली.

श्री क्षेत्र नारायण गड येथे स्वयंभू ज्योतिर्लिंग प्रकट होत असून प्रभू रामचंद्र पासूनचे कृपाशिर्वाद असल्याचा श्री क्षेत्र



नारायण गडचा महिमाही त्यांनी विषद केला.

सप्ताहात महिलांची लक्षणीय उपस्थिती

सिरसमार्ग येथे सुरु असलेल्या नारळी सप्ताहात महिलांची लक्षणीय उपस्थिती आहे. सिरसमार्गसह तरटेवाडी. काळेवाडी, शहाजानपूर, दिमाखवाडी, टाकळगव्हाण, मानकापूर, खडकी, मादळमोही, पोखरी, लोळदगाव, साक्षाळपिंप्रीसह परिसरातील अनेक गावच्या महिला उपस्थिती लावत आहेत.

थोरामोठ्यांनी घेतले बाबांचे आशीर्वाद

सिरसमार्ग येथील नारळी सप्ताहात थोरामोठ्यांची व संतमहंतांची उपस्थिती राहिली आहे. यामध्ये नामदेव महाराज शेकटेकर, जिल्हा परिषद सदस्य बप्पासाहेब अण्णा तळेकर, गडाचे विश्वस्त सीए बी.बी.जाधव, बळीराम अप्पा गवते आदींनी उपस्थिती लावली आहे. सप्ताहात युपीएससी उत्तीर्ण झालेले पाडळी येथील अभिजित पाखरे यांनी महंत शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांनी त्यांचा सत्कार केला.

सिरसमार्गकरांच्या नियोजनाला दाद

सिरसमार्ग येथे सुरु असलेल्या नारळी सप्ताहात ग्रामस्थांनी वेगवेगळ्या दहा समिती तयार करुन नियोजन केले आहे. यामध्ये पिण्याचे पाणी व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, महाप्रसाद भोजन व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था अगदी काटेकोरपणे कार्यरत आहे. तरुणांच्या या नियोजनला महंत शिवाजी महाराज यांच्यासह येणारे भाविक दाद देत आहेत.



## आदर्श पत्रकार पुरस्कार गितांजली लव्हाळे यांना जाहीर

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने महिला दिनानिमित्त आदर्श पत्रकार पुरस्कार गितांजली लव्हाळे यांना जाहीर करण्यात आला होता त्या कामानिमित्त आल्या नव्हत्या त्यांना आज पुरस्कार वितरण करण्यात आला यावेळी पुरस्कार देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, युवा नेते स्वप्निल गलधर, वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य बप्पासाहेब हावळे, युवा पत्रकार संघाचे सचिव जावेद पठाण यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी आण्णासाहेब साबळे, संतोष नागरगोजे,अक्षय विधाते, प्रा शिवशंकर पटवारी,प्रा ओंकार देशमुख,प्रा भुषण मन्पती,प्रा राजश्री महाराज,प्रा सुहास गाढवे,दिपक जाधव, इम्रान पठाण आदी दिसत आहेत.

## जागृत देवस्थान शिंदी येथे रेणूका मातेची यात्रा संपन्न

### गाड्या ओढण्याची प्रथा ६० वर्षापासून सुरू

मस्साजोग । प्रतिनिधी

जागृत देवस्थान असलेल्या शिंदी ता. केज येथे रेणूकामातेचा यात्रा महोत्सव दिनांक २३ एप्रिल मंगळवार रोजी संपन्न झाला. यात्रेची परंपरा हि गेली ६० वर्षापासून सुरू आहे. या यात्रेची सुरूवात इ.स १९६४ साली कदमवाडी येथील कै. पंढरीनाथ दादा कदम या भक्ताने केली होती,या यात्रेत गाड्या ओढण्याचा पहिला मान मुस्लीम समाजाला होता ,आता तो मान घाटेवाडीच्या रोमन परिवाराला दिला जातो.चैत्र शुद्ध सप्तमीला गावातील ३०० पेक्षा जास्त भक्त यात्रेच्या ८ दिवस अगोदर देवीची सेवा



करून उपवास धरतात व विविध सास्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यामध्ये किर्तन , भारूड, आरादी मेळा ,गोंधळी कला अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करतात.या यात्रेत गाड्या ओढण्याची प्रथा गेली ६० वर्षापासून सुरू आहे.चैत्र पौर्णिमेच्या दिवशी गाड्या ओढण्यासाठी गावातील लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिका पर्यंतचे लोक सहभाग घेतात.या यात्रेसाठी महाराष्ट्रभरातून भक्त दर्शनासाठी येतात व पौर्णिमा झाल्यानंतर चार दिवसांने देवीचा छबाना पालखी मिरवणूक संपूर्ण गावात काढली जाते .या यात्रेत सर्व जाती धर्माचे लोक सहभाग नोंदवतात . हि यात्रा दरवर्षी उत्साहात साजरी केली जाते.

## जयभवानीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० स्कूल कनेक्ट भाग-२ कार्यक्रम संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

येथील जयभवानी महाविद्यालयात स्कूल कनेक्ट भाग-२ उपक्रमांतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विनोद किर्दक यांनी आपले विचार व्यक्त करतांना म्हणाले की, देशभरात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (नॅशनल एज्यूकेशन पॉलिसी - एन ई पी) अंमलात आणल्यानंतर शिक्षण क्षेत्रात मोठे बदल होणार आहेत. शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची तयारी आता महाराष्ट्रात सुरू झालेली आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून (जून २०२४) पासून उच्च शिक्षण क्षेत्रात म्हणजेच राज्यातील सर्व विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अभ्यासक्रम आराखडा आणि श्रेयांक म्हणजेच क्रेडिट्स आ राखडा तयार केला आहे. पुढे बोलतांना ते म्हणाले की




नवीन शैक्षणिक धोरणानुसार

येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन धोरण अवलंबलं जाणार असल्याचं राज्य सरकारने स्पष्ट केलं आहे. हा बदल पदवी अभ्यासक्रमात पहिल्या वर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू असेल.

येत्या शैक्षणिक वर्षापासून तीन महत्त्वाचे बदल लागू होतील या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची तयारी आता महाराष्ट्रात सुरू आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून (जून २०२४) पासून उच्च शिक्षण क्षेत्रात म्हणजेच राज्यातील सर्व विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होईल

तसंच नवीन धोरणानुसार, पदवी अभ्यासक्रमात क्रेडिट गुणांकन पद्धती आणि विषय निवडीचे स्वातंत्र्य असणार आहे. पदवी आणि पदव्युत्तर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी अनेक पर्याय उपलब्ध असतील.

चार वर्षांच्या पदवीचा पर्याय- दुसरा बदल

येत्या शैक्षणिक वर्षापासून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचा पर्याय विद्यार्थ्यांना असेल. याला ऑनर्स पदवी असं म्हटलं जाईल. तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम कायम राहील.

### मल्टिपल एन्ट्री आणि मल्टिपल एक्झीट

पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण सुरू असताना काही अटींसह विद्यार्थ्यांना मध्येच शिक्षण सोडून पुन्हा प्रवेश घेत आपलं शिक्षण पूर्ण करता येणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना सात वर्षांची मुदत दिली जाणार आहे. यापूर्वी ही मुदत सहा वर्षांपर्यंत होती.अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. डॉ. सय्यद शौकत यांनी तर आभार प्रा. डॉ. सुनिल जाधव यांनी मानले या कार्यक्रमास बारावी वर्गातील पूर्ण विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन चैत्र पोर्णिमा उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुका शाखेच्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे वर्ष भरातील सर्व पोर्णिमा तसेच सर्व महापुरुषांच्या जयंत्या विविध उपक्रमाने साजरी केल्या जातात याचाच एक भाग म्हणून दि २३ एप्रिल २०२४ वार रविवार रोजी फाल्गुण पोर्णीमा उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव च्या महिला सचिवा विषाखाताई वाघमारे या होत्या या कर्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार सचिव बीड पुर्व आद.शामभाऊ वाघमारे, जिल्हा पर्यटन सचिव आद.के व्ही साळवे सर भारतीय बौद्ध महासभा



माजी तालुका अध्यक्ष ॲड राहुल निसर्गंध ,सेलापुरीच्या उपसरपंच शुशीलाताई घडसे, बहुजन समाज पार्टी चे महासचिव हरिभाऊ साळवे, सिद्धार्थ घडसे,लोकनेते सुंदरराव सोळके अर्बन चे वसुली अधिकारी संदेश डोंगरे सह तालुक्यातील धम्म उपासक उपासिका उपस्थित होते या पौर्णीमेचे भोजनदान सेवानिवृत्त कर्मचारी पाठबंधारे विभाग विष्णु हरिभाऊ साळवे यानी दिले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे संस्कार उपाध्यक्ष डॉ भागवत साळवे यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे ता संस्कार सचिव दयानंद साळवे यांनी केले यांनी केले तर आभार भारतीय बौद्ध महासभा ता महिला उपाध्यक्षा लिलाताई उजगरे यांनी मानले या प्रसंगी ,आद के व्ही साळवे सर यांनी चैत्र पोर्णिमा चे महत्व पटवुन दिले माजी तालुका अध्यक्ष ॲड राहुल निसर्गंध यांनी मार्गदर्शन केले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे डी एस साळवे,डी पी पोटभरे,मंदाताई साळवे, प्रकाश साळवे,भानूदास साळवे , मोहन काकडे,भगवान डोंगरे, बाबासाहेब घनघाव ,नितिन डोंगरे, हिरवे ताई,गायसमुद्रेताई,पंचशिला समुद्रे, सिरसट ताई,कुशीवर्ता साळवे, वैशाली साळवे,छायाताई शिंदे,कुसुमताई काकडे, महादेव पोटभरे,शांतीदुत साळवे, सम्राट पोटभरे, विशाल उघडे यांच्या सह भारतीय बौद्ध महासभा पदाधीकारी यांनी परिश्रम घेतले.

## सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सिताराम क्षीरसागर यांची नियुक्ती

माजलगाव । प्रतिनिधी

येथिल सामजिक कार्यकर्ते सिताराम क्षीरसागर यांची सामाजिक न्याय विभागाच्या



जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती जिल्हाध्यक्ष सामाजिक न्याय विभागा पंकज हजारे यांनी पत्राद्वारे केली आहे

या पत्रात पुढें म्हंटले आहे की महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार बीड जिल्हा सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हाउपाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब, कार्याध्यक्ष खा.सुप्रियाताई सुळे, प्रांतअध्यक्ष मा. जयंतरावजी पाटील साहेब तसेच जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर अभिप्रेत असणारी संघटना बांधणीसाठी आपण प्रयत्नशिल रहाल. पक्ष बळकटीसाठी व पक्ष मजबुत करण्यासाठी पक्षाची ध्येय धोरण समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्यासाठी आपण कटीबद्ध रहाल असा विश्वास आहे. या नियुक्तीपत्र व्यक्त करण्यात आला असून यांच्या या निवडीचे पत्र किसान सेलच्या राज्य अध्यक्ष पूजाताई मोरे यांच्या हस्ते देण्यात आले या निवडीचे माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा अध्यक्ष नारायण डक तालुकाध्यक्ष मनोहर डाके बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस कचरूजी खळगे दयानंद स्वामी माजी नगराध्यक्ष मंजूर भाई शेख शहराध्यक्ष शकील कुरेशी इत्यादीने अभिनंदन केले आहे.

## बीड लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक नियुक्त

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघांचे निवडणूक निरीक्षक भारतीय प्रशासकीय सेवेतील अजिमुल हक हे नियुक्त करण्यात आले आहेत. श्री हक हे भारतीय प्रशासकीय सेवेतील दिल्ली कॅडरचे अधिकारी आहेत. ते आज (गुरुवार) पासून बीडच्या दौऱ्यावर आहेत.त्यांचा संपर्क क्रमांक ९४०४५९२५११ हा आहे. ते शासकीय विश्रामगृहात थांबणार असुन त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश मोकाटे आहेत.राजस्थान कॅडरचे पोलीस उप महानिरीक्षक, योगेश यादव, हे ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी कायदा व सुव्यवस्था निरीक्षक म्हणुन नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांचे वास्तव्य 'बिंदुसरा ' या पोलिस विभागाच्या विश्रामगृहावर असणार आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ९४०३६३५६११ हा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक, संजय तुपे हे असणार आहेत.

## पिंपळवंडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे प्रतिवर्षाप्रमाणे दि.२३/०४/२०२४ मंगळवार रोजी विश्वरत्न,भारतरत्न,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सार्वजनिक १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानचे मठाधिपती महादेवानंद भारती महाराज तर प्रमुख पाहुणे निलेश मोरे,गोविंद गाडे,कॅप्टन राजाभाऊ आठवले ,अमरसिह ढाका,ॲड.सतीश शिंदे,सुरज काळूखे, राजाराम जाधव,दादासाहेब पवार आदी होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे शुभहस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे,लहुजी साळवे यांच्या प्रतिमेचे



पूजन करून अभिवादन करण्यात येऊन दिप प्रज्वलन केले.याप्रसंगी महंत महादेवानंद भारती महाराज, राजाभाऊ आठवले, अमरसिंह ढाका, ॲड.सतीश शिंदे, कु. कोमल गाडे यांनी भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याची व सामाजिक कार्याची सविस्तर ओळख करून देऊन त्यांचे विचार व आदर्श घेण्याचे मार्गदर्शन केले.यावेळी सर्वांनी भाषणातून धम्म म्हणजे नीती,नीती म्हणजे माणसाने माणसासम कशा प्रकारे वागायचे त्यास नियतीचा धम्म असे म्हणतात.पाच पंचशील हे जीवन जगण्याचा मार्ग आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे कार्य समाजातील प्रत्येकासाठी प्रत्येक जाती धर्मासाठी अलौकिक होते.प्रत्येकानी त्यांचे विचार आत्मसात करावेत.शिक्षणामुळे माणूस सज्ञान होऊन समाजाची प्रगती होते. आजच्या काळात शिक्षणामुळेच नवक्रांती घडू शकते.हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ३२ पदव्या घेऊन सिद्ध केले आहे.सर्वांनी संतांचे विचार आचरणात आणून रामायण व कुराण प्रमाणे संविधान वाचले पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर डॉ.आंबेडकरांचे विचार अमलात आणून त्यांचा आदर्श घेतला पाहिजे.छत्रपती शिवराय,आरक्षणाचे जनक शाहू महाराज, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाजाला दिशा देण्याचे कार्य केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आदर्श घटनेची निर्मिती करून महान कार्य केलेले आहे,हे सर्वांनी भाषणातून सांगितले.यानिमित्त सायंकाळी ५ नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य आकर्षक रथातून डिजेसह तोफा फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य-दिव्य मिरवणूक संपन्न झाली.या कार्यक्रमाला व मिरवणुकीत आजी-माजी सरपंच,उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य चेअरमन, पत्रकार सर्व स्तरातील नागरिक,ग्रामस्थ, समाज बांधव व महिला युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.जयंती उत्सव यशस्वीतेसाठी राजू मोरे,दिपक गाडे,विजय मोरे,संजय गाडे,संजय मोरे,प्रकाश मोरे, उमेश गाडे,अंबादास मोरे,जालिंदर गाडे,प्रकाश गाडे, आजिनाथ गाडे,बाळू गाडे,रवी मोरे, गणेश गाडे,युवराज गाडे,आकाश मोरे, अनिकेत मोरे,शंतनु मोरे,अशोक गाडे, शंकर गाडे आदींनी बहुमूल्य परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश पवार सर यांनी केले.

## पंधराव्या शिवार साहित्य संमेलनातील कथाकथनाला रसिकांची दाद

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषदे शाखेच्या वतीने फुलेपिंपळगाव येथे मंगळवारी ( दि.२३) आयोजित १५ व्या शिवार साहित्य संमेलनातील कथाकथन सत्राला रसिकांनी भरभरून दाद दिली. या कथाकथन सत्राच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष कांतराव गाजरे होते. यावेळी प्रसिद्ध कथाकार विलास सिंदगीकर यांचा सहभाग होता.




सुरुवातीला विलास सिंदगीकर यांनी देवकामायचं शाड ही कथा सादर केली. यामध्ये त्यांनी ग्रामीण भागातील रूढी, परंपरांवर आघात केला. या प्रबोधनात्मक कथेला रसिकांनी भरभरून दाद दिली. अध्यक्ष समारोपात कांतराव गाजरे यांनी कथांचे विविध प्रकार सांगितले. साने गुरुजी कथामालेच्या माध्यमातून विविध ठिकाणी कथाकथन तंत्र मंत्र शिबिराचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आत्तापर्यंत एक लाख बेचाळीस हजार बालसाहित्याची विक्री केल्याचे त्यांनी सांगितले. विविध शाळांमधून श्यामची आई या पुस्तकावर आधारित संस्कार परीक्षांचे देखील आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी गीत कथा सादर केल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल वायाळ यांनी केले तर आभार गोविंद गोचडे यांनी मानले. यावेळी संमेलनाध्यक्ष अनिलकुमार साळवे, मुकुंदराज सोळंके, जगदीश पोपळे, स्नेहल पाठक, भाऊसाहेब राठोड, किशोर गुंजकर, बालासाहेब झोडगे , प्रा. डॉ.उमेश साडेगावकर, प्रा. डॉ. वैशाली गोस्वामी, प्रभाकर साळेगावकर, रामकिसन सोळंके, प्रा. संगीता जाधव, गौरी देशमुख, स्मिता लिबगावकर, रामराव लांडगे, खेलबा काळे, बालाप्रसाद चव्हाण, हिरामण डावरे, मोहन राठोड, रामकिसन सोळंके, वैभव सोळंके, भारत सोळंके, पद्माकर रुचके, जीवन पांचाळ, वसंत पाटील, चंद्रशेखर साखरे, एल. के. सोळंके यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

cmyk




# पिकातील सुत्रकृमींचा प्रादुर्भाव असा ओळखा

वेगवेगळ्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळतो. या रोगाची सुरुवातीची लक्षणे दिसून येत नसल्यामुळे उपाय योजना करायला उशीर होतो व त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही पिकांच्या उत्पादनात सूत्रकृमींमुळे १२ ते १३ टक्के घट होते. जाणून घेऊ या सुत्रकृमी रोगाची सुरुवातीची लक्षणे व त्यावर करायचे एकात्मिक नियंत्रण उपाय.

प्रसारणाची कारणे : प्रादुर्भावग्रस्त जमिनीत वापरली जाणारी शेती अवजारे, चप्पल व बूट यासोबत येणाऱ्या मातीमधून सूत्रकृमीचा प्रसार होऊ शकतो. प्रादुर्भावग्रस्त रोपे, बेणे यांचेमार्फत प्रादुर्भावग्रस्त जमिनीतून वाहणाऱ्या पाण्यामुळे सूत्रकृमी शेतात येऊ शकतात. पक्षी किंवा कीटका मार्फतही या रोगाचा प्रसार होतो

सुत्रकृमीच्या गाठी कशा ओळखायच्या? : सुत्रकृमीमुळे झालेल्या गाठी ओळखणे अवघड असते. सूत्रकृमींच्या प्रादुर्भावामुळे पिकांच्या मुळावर वैशिष्ट्यपूर्ण गोलाकार सूज येऊन गाठी तयार होतात. डाळवर्गीय पिकांच्या मुळावरील गाठी आणि सूत्रकृमींच्या गाठी यामध्ये गोंधळ होऊ शकतो, मात्र त्यामधील फरक लक्षात घ्यावा. डाळवर्गीय पिके उदा. हरभरा, मूग, मटकी, उडीद, तूर किंवा तेलबिया पिके उदा. सोयाबीन, भुईमुग यांच्या मुळावर असलेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होतात. त्या पूर्णपणे गोलाकार आणि काही प्रमाणात लालसर




असतात. या गाठी नत्र स्थिरीकरण करणाऱ्या उपयुक्त जिवाणूंमुळे तयार होतात. सूत्रकृमीच्या प्रादुर्भावामुळे तयार झालेल्या गाठी सहजासहजी वेगळ्या होत नाहीत. या गाठी म्हणजे मुळाचीच जादा झालेली बाह्य वाढ असते. या गाठींचा रंग मुळाप्रमाणेच असतो.

पिकांवर सूत्रकृमीच्या प्रादुर्भावाची लक्षणे : पिकांच्या मुळ्या वेड्यावाकड्या होतात. पिकांना मुळाकडून पाणी व अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मुळांची व पर्यायाने पिकांची वाढ खुंटते. पाने पिवळी पडलेली दिसतात. जमिनीमध्ये पाण्याचा अंश पुरेसा असतानाही पीक सुकल्यासारखे दिसते किंवा झाड संपूर्ण सुकते. भाजीपाला पिकात सुत्रकृमीच्या गाठींना तडे जाऊन त्या उघड्या पडतात. फुले, फळे कमी लागतात. जास्त प्रादुर्भावाच्या स्थितीत असे पीक मरून जाते. मोठ्या झाडामध्ये सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन झाडाझुडपांची वाढ मंदावते.

सूत्रकृमी नियंत्रणाचे एकात्मिक उपाय : उन्हाळ्यामध्ये जमिनीची खोलवर नांगरट करावी. पिकांची फेरपालट करावी. पिकामध्ये झेंडूची लागवड हा सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी उत्तम उपाय आहे. मिश्र पिकांची लागवड करावी. धैंचा, ताग यासोबतच मूग, उडीद, चवळी या सारखी द्विदल वर्गीय किंवा हिरवळीची पिके घ्यावीत. सेंद्रिय खते उदा. निंबोळी किंवा एरंड पेंड १.५ ते २ टन प्रति हेक्टर या प्रमाणात १५ दिवस अगोदर वापर करून पाणी द्यावे. सूत्रकृमींचा प्रादुर्भाव नसलेल्या किंवा प्रतिकारक रोपांचा वापर करावा. पॅसिलोमायसिस लिलियानस ही मित्र बुरशी सूत्रकृमींची नैसर्गिक शत्रू आहे. पॅसिलोमायसिस लिलियानस प्रमाणेच स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी यांची १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

जमिनीत शेणखतातून पॅसिलोमायसिस लिलियानस, स्युडोमोनस फ्ल्यूरोसन्स किंवा ट्रायकोडर्मा व्हिरीडी या पैकी एक ५ ते १० किलो प्रमाणात १०० किलो संपूर्ण कुजलेल्या, ओलसर शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीत किंवा फळझाडांना खोडालगत मातीत मिसळून हलके पाणी द्यावे. फ्लुयोपायरम (३४.४८ % एससी) २५० ते ३०० मि.लि. प्रति एकर या प्रमाणात आळवणीद्वारे द्यावे. किंवा ॲबामेक्टीन (१.८ ईसी) ४० मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या प्रमाणे मिसळून जमिनीमधून द्यावे.

## दिन विशेष




### महत्वाच्या घटना

१६०७ : ८० वर्षांचे युद्ध नेदरलँड्सने जिब्राल्टरजवळ स्पेनचे आरमार बुडवले.
१७९२ : क्लॉड जोसेफ रूगे दि लिलने फ्रेंच राष्ट्रगीतला मार्सेलची रचना केली.
१८२९ : चार्ल्स फ्रीमॅन्टल पश्चिम ऑस्ट्रेलियाला पोचला.
१८४६ : मेक्सिको व टेक्सासच्या प्रजासत्ताक मध्ये सीमावाद चिघळला. चकमकी सुरू.
१८५९ : प्रसिध्द सुएझ कालव्याच्या बांधकामास सुरुवात.
१८६२ : अमेरिकन यादवी युद्ध उत्तरेने न्यू ऑर्लिअन्स जिंकले.
१८६७ : दक्षिण आफ्रिकेत श्वेत लोकांना मतदान करण्याची अनुमती मिळाली.
१८९८ : अमेरिकेने स्पेनविरुद्ध युद्ध पुकारले.
१९०१ : अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यात स्वयंचलित वाहनांना नंबरप्लेट लावणे सक्तीचे केले.
१९१५ : पहिले महायुद्ध ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंडचे सैन्य तुर्कस्तानमध्ये उतरले.
१९२५ : जर्मन सैन्यदलाचे कमांडर जनरल आणि राजकारणी पॉल पॉल लुडविग हंस अँटोन फॉन बेनेकेंडोर्फ अंड वॉन हिंदेनबर्ग यांची राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली होती.
१९२६ : ईराणमध्ये रझा शाह पहलवी सत्तेवर.
१९४५ : दुसरे महायुद्ध मिलानमधून नाझींची हकालपट्टी.
१९५३ : डी. एन. ए. रेणूचे अंतरंग उलगडून दाखवणारा वॉटसन आणि क्रीक यांचा शोधनिबंध नेचर मासिकात प्रकाशित झाला.
१९६६ : एका भूकंपामुळे ताश्कंद शहराचा मोठ्या प्रमाणावर विनाश झाला.
१९७४ : पोर्तुगालमध्ये जनतेचा उठाव. लोकशाही पुन्हा अमलात.
१९८२ : रंगीत दूरदर्शन प्रक्षेपणाला सुरुवात.
१९८३ : अंतराळयान पायोनियर १०सूर्यमालेच्या पलीकडे पोचले.
१९८६ : म्स्वाती तिसरा स्वाझीलँडच्या राजेपदी.
१९८९ : श्रीलंकेच्या संसदेने भारतीय वंशाच्या ३,३०,००० तमिळ जनतेला मताधिकार देण्याचा निर्णय घेतला.
२००० : वादग्रस्त आलमट्टी धरणाची उंची ५१९.६ मीटरपर्यंत वाढविण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली.
२००५ : जपानच्या आमागासाकी शहराजवळ रेल्वे अपघात. १०७ ठार.
२००८ : जागतिक मलेरिया दिन
२००८ : हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध कलाकार, अभिनेते व चित्रपट दिग्दर्शक आमिर खान यांना चित्रपट क्षेत्रांतील आपल्या महत्वपूर्ण योगदानाकरता मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.
२०१५ : ७.८ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपामुळे नेपाळ देशात ९१०० जण मारले गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

३२ : मार्कस साल्व्हियस ओथो, रोमन सम्राट.
१२१४ : लुई नववा, फ्रांसचा राजा.
१२२८ : कॉन्राड दुसरा, जर्मनीचा राजा.
१२८४ : एडवर्ड दुसरा, इंग्लंडचा राजा.
१५४५ : यी सुन शिन, कोरियन दर्यासारंग.
१५९९ : ऑलिव्हर क्रॉमवेल, ब्रिटीश राजकारणी, अघोषित राजा.
१७४३ : मेवाड प्रांताचे शासक महाराजा महाराणा प्रताप सिंग द्वितीय यांचे पुत्र राजसिंग दुसरा यांचा जन्मदिन.
१७९४ : ब्रिटीशकालीन भारतातील हैदराबाद प्रांताचे रियासतदार(शासक) मुघल शासक मीर फर्कंदा अली खान उर्फ नासिर-उद-दौला यांचा जन्मदिन.
१८१९ : भारतातील जयपूर राज्याचे शासक महाराजा जय सिंह यांचा जन्मदिन.
१८७४ : गुग्लियेमो मार्कोनी, इटलीचा संशोधक, भौतिकशास्त्रज्ञ, रेडिओ संशोधक.
१९०० : प्रख्यात ब्रिटिश नागरी सेवक, मुत्सद्दी आणि राजकारणी तसेच संयुक्त राष्ट्र संघाचे माजी कार्यवाहक सरचिटणीस ह्युबर्ट माइल्स ग्लॅडविन जेब यांचा जन्मदिन.
१९०४ : भारतीय हिंदी साहित्यकार विद्वान चंद्रबली पाण्डेय यांचा जन्मदिन.
१९१२ : भारतीय तमिळ अभ्यासक व लेखक तसचं, तामिळनाडू येथील शैक्षणिक कर्ते म्यू. वरथराजन यांचा जन्मदिन.
१९१८ : हिंदी व मराठी चित्रपट अभिनेते शाहू मोडक यांचा जन्म. (मृत्यू: ११ मार्च १९९३)
१९१९ : साली काँग्रेस पक्षाचे नेता व उत्तर प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री हेमवती नंदन बहुगुणा यांचा जन्मदिन.
१९४० : हॉलिवूडमधील अभिनेता अल पचिनो यांचा जन्म.
१९६१ : अभिनेता, लेखक आणि दिग्दर्शक करण राझदान यांचा जन्म.
१९६१ : भारतीय-अमेरिकन पत्रकार आणि लेखक दिनेश डिसोझा यांचा जन्म.
१९६४ : भारतीय राजकारणी आर. पी. एन. सिंग यांचा जन्म.
१९६९ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय व्यावसायिक फुटबॉल खेळाडू कालो हरीन यांचा जन्मदिन.
२००८ : जागतिक मलेरिया दिन

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११८५ : अंतोकु, जपानी सम्राट.
१२९५ : सांचो चौथा, कॅस्टिलचा राजा.
१६०५ : नरेस्वान, सयामचा राजा.
१६४४ : चाँगझेंग, चीनी सम्राट.
१७४० : थोरले बाजीराव पेशवे, मराठा साम्राज्याचे पेशवे.
१८४० : सिमिओन-डेनिस पोइसॉन, फ्रेंच गणितज्ञ.
१९९९ : साहित्यिक पंढरीनाथ रेगे यांचे निधन.
२००० : भारतीय चित्रपट गीतकार, पटकथा आणि कथा लेखक मुखराम शर्मा यांचे निधन.
२००२ : लाटव्हियाच्या योगशिक्षिका इंद्रा देवी यांचे निधन. (जन्म: १२ मे १८९९)
२००३ : ब्रिटिश शिल्पकार लिन चॅडविक यांचे निधन. (जन्म: २४ नोव्हेंबर १९१४)
२००५ : स्वामी रंगनाथानंद, भारतीय तत्त्वज्ञानी; अध्यक्ष, रामकृष्ण मिशन.

# शेतकऱ्यांना ४००० कोटी रुपये मिळणार - फडणवीस

पुणे :''लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपताच राज्यातील शेतकऱ्यांना ४००० कोटी रुपयांचा फायदा दिला जाणार आहे. लोकसभा निवडणूक तारखा जाहीर होण्याच्या अगोदर राज्य सरकारने राज्यातील सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ४००० कोटींची आर्थिक मदत जाहीर केली आहे. मात्र, आता लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागल्याने ते पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले नाही. आचारसंहिता संपताच हे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहेत.'' असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव येथील निवडणूक प्रचारसभेत बोलत होते.


यावर्षी राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी आणि कापूस उत्पादक शेतकरी यांनी कमी दराचा मोठा आर्थिक फटका बसला आहे. अर्थात संपूर्ण हंगामात या दोन्ही पिकांचे दर हे खूपच कमी राहिले. ज्यामुळे आधीच दुष्काळी परीस्थिती त्यात योग्य दर न मिळाल्याने शेतकऱ्यांचा राज्य सरकारसह केंद्रातील मोदी सरकारवर मोठा रोष आहे. हाच रोष कमी करण्यासाठी एकनाथ शिंदे- देवेंद्र फडणवीस सरकारने लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याच्या अगदी दोनच दिवस अगोदर मोठी घोषणा केली होती. ज्यात राज्यातील सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ४००० कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा करण्यात आली होती. त्याबाबत बोलताना फडणवीस यांनी ही माहिती दिली आहे.

युद्धजन्य परिस्थिमुळे दर घसरण

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ६ हजार रुपये दिले आहेत. तर राज्य सरकारने देखील ६ हजार रुपये दिले. जगभरात काही देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

रशिया-युक्रेन युद्ध, इराण-इस्त्रायल युद्ध या युद्धजन्य परिस्थिमुळे कापसावर निर्बंध आले आहेत. परिणामी कापूस आणि सोयाबीनचे भाव कमी झाले आहेत. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजाराचा प्रभाव देशातील बाजारात दिसून आला. ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळाला नाही. मात्र, सरकारकडून लवकरच शेतकऱ्यांना ४००० कोटी रुपयांचा फायदा दिला जाणार आहे. असेही त्यांनी म्हटले आहे.

# तंत्रज्ञानाच्या मदतीने करा बांबूची शेती



बांबूची शेती ही महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा एक टिकाऊ स्रोत बनू शकते. जलद वाढणारी आणि बहुउपयोगी असलेली ही वनस्पती आपल्या राज्याच्या विविध हवामानात चांगली येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांबूची शेती केल्यास चांगला फायदा होतो. महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे येणारे मांजरी (डेंड्रोक्लॅमस स्ट्रिक्टस), कांटेरी बाँबू (बांबुसा बांबोस), मंगा (डेंड्रोक्लॅमस स्टॉक्सी) आणि चिंच (मुनरोचलोआ रिचीई) हे बांबू चांगले येतात. तुमच्या जमिनीच्या हवामानानुसार जातीची निवड करा. बियाण्यांपासून रोपे तयार करण्यासाठी रोपवाटिका तयार करा. चांगल्या मिश्रित मातीमध्ये बियाणे पेरा आणि त्यांची काळजी घ्या. ऑनलाइन मृदा चाचणी करून तुमच्या जमिनीची पोषकद्रव्ये तपासा. त्यानुसार खतांचा वापर करा. तुमच्या जमिनीच्या आकाराच्या आधारे रोपांची संख्या ठरवा.

रोपण आणि देखभाल : तुमच्या शेताचे नकाशा तयार करण्यासाठी जिपीएसचा वापर करा. यामुळे रोपांमधील अंतर आणि रांगा एकसार ठेवणे सोपे होईल. मोठ्या क्षेत्रात रोपांची लागवड करण्यासाठी तुम्ही स्वस्त ड्रोनचा वापर करू शकता. यामुळे वेळ आणि पैसा वाचतो. हवामान अंदाजाच्या ॲप्सचा वापर करून पाण्याचा योग्य नियोजन करा. हे तुमच्या बांबूच्या चांगल्या वाढीसाठी मदत करेल. किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जैविक किटकनाशकांचा वापर करा. हे तुमच्या बांबूच्या गुणवत्तेसाठी आणि पर्यावरणाची चांगली राखण करण्यासाठी फायदेशीर आहे.

कापणी आणि विक्री : तुमच्या बांबूची वाढ मॉनिटर करण्यासाठी उपग्रह प्रतिमांचा वापर करा. यामुळे योग्य वेळी कापणीची तयारी करता येते. तुमच्या बांबूची विक्री करण्यासाठी कृषी उत्पादनांच्या ऑनलाइन बाजारपेठांचा फायदा घ्या. हे व्यापारी आणि शेतकऱ्यांना जोडणारे असून चांगला दर मिळवून देते.

महाराष्ट्र सरकार बांबूच्या लागवडीवर अनुदान देते. या योजनांची माहिती कृषी विभागाच्या कार्यालयाकडून मिळवा. बांबूच्या विविध प्रक्रिया उद्योगांची माहिती मिळवा. हे तुमच्या बांबूपासून अधिक उत्पन्न मिळवण्यास मदत करेल.

# दुष्काळात अशी घ्या फळबागेची काळजी!

सध्याच्या परिस्थितीत फळबागेची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कारण राज्यात काही ठिकाणी अवकाळी पाऊस आणि गारपीट स्थिती असली तरी काही ठिकाणी तापमानात वाढ होताना दिसून येत आहे. राज्यात पुढील काळात तापमानात अजून वाढ होण्याची शक्यता आहे. दुष्काळी परिस्थितीत फळबागेची कशी काळजी घ्यावी याविषयी तज्ज्ञांनी सुचविलेले उपाय जाणून घेतल्यास अडचणीवर मात करता येऊ शकते.

ठिबक सिंचन पद्धती : उन्हाळ्यामध्ये पिकांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. यामुळे ५० ते ६० टक्के पाण्याची बचत होते. उत्पादनात २० से २५ टक्के वाढ मिळू शकते.

जैविक आच्छादन : फळबागेत जैविक आच्छादनाकरिता पालापाचोळा, लाकडी भुसा, वाळलेले गवत, उसाचे पाचट, सोयाबीनचा भुसा, गव्हाचे काड अशा सेंद्रिय संसाधनांचा वापर करावा. जैविक आच्छादनाची जाडी १२ ते २५ सें.मी. असावी. जैविक आच्छादनामुळे उन्हाळ्यात दोन पाण्याच्या पाळीतील अंतर वाढवता येतो व जमिनीचे तापमान नियंत्रित होते.

मडका सिंचन पद्धती : २ ते ३ वर्षाच्या झाडांसाठी ५ ते ७ लिटर तर मोठ्या झाडांसाठी १० ते १५ लिटरची मडकी वापरावीत. मडकी छिद्रांकित व कमी भाजलेली असावीत. भाजलेल्या मडक्याच्या खालील बाजूस छिद्र पाडून त्यामध्ये कापडाची चिंधी किंवा नारळाची शेंडी बसवावी.

बाष्परोधकांचा वापर : पानातून जाणारे पाणी वाष्परोधकांचा वापर करून कमी करता येते. यासाठी पर्णरंद्रे बंद करणारी फिनील मरक्यूरी ॲसिटेट, ॲचसिसिक ॲसिड तर पानावर पातळ थर तयार करणारे केओलीन, सिलिकॉन ऑईल, मेण इत्यादी



बाष्परोधकांचा वापर करावा.

बोर्डोपेस्टचा वापर : उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे खोडावरील साल तडकून बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी खोडाला बोडोपेस्ट लावावी. १ ते २ मीटर उंचीपर्यंत बोडों पेस्ट लावावी, बोडोपेस्ट लावण्याने सूर्यकिरण परावर्तित होतात, खोडाचे तापमान कमी राहते, साल तडकत नाही.

खतांची फवारणी : उन्हाळ्यात तापमान जास्त असल्यामुळे पाण्याचे प्रमाण कमी होऊन पानात कमी अन्नांश तयार होतात. यावेळी १ % टक्का पोटॅशियम नायट्रेट व २ टक्के डीएपी यांची २५ ३० दिवसाच्या अंतराने एक आड एक फवारणी करावी. ज्यामुळे अन्नांश तयार होण्याची क्रिया गतिमान होऊन झाडे जमिनीतील ओलावा शोषण्यास सुरुवात करतात.

बागेसाठी वारारोधक : उन्हाळ्यामध्ये अति उष्ण वार्यामुळे बागेमध्ये बाष्पिभवनाचे प्रमाण वाढून बागेस नुकसान होऊ शकते. यापासून संरक्षण करण्यासाठी बागेभोवती गोणपाट, जुन्या साड्या, हिरवे शेडनेट, खताच्या पिशव्या यांचा आडोसा करून उष्ण हवा बागेत जाणार नाही, अशा पद्धतीने वारा रोधके लावावीत.

सावलीसाठी मांडव : नवीन लागवड केलेल्या फळझाडांना पहिल्या १ ते २ वर्ष उन्हापासून संरक्षण देण्यासाठी सावली करावी. झाडाच्या सर्व बाजूंना ३ फुट लांबीच्या बांबू, कामठवा, गवत यांचा वापर करून सावलीसाठी मांडव तयार करावा. वाळलेल्या गवताऐवजी बारदाना किंवा शेडनेटचा वापर देखील उपलब्ध असेल तर करू शकता.

जैविक वारा रोधके : उन्हाळ्यात जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे बागेभोवती सुरुवातीलाच शेवरी, मलबेरी, चिलार, चिंच, सुबाभूळ, ग्लिरीसीडीया, सरु, शेर, निवडुंग यापैकी उपलब्ध वनस्पतींची कुंपणाकरिता लागवड करावी. यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन फळबागांचे संरक्षण होते.

पानोळा कमी करणे : पानातून पणर्णोत्सर्जनाद्वारे वाया जाणारे पाणी कमी करण्यासाठी झाडाच्या खालच्या व आतील भागातील अनावश्यक फांद्या व पानांची रोगमुक्त सिकेटरचा वापर करून विरळणी करावी. यामुळे पानाद्वारे होणारे बाष्पीभवन कमी होऊन झाडांना लागणार्या पाण्याची गरज कमी होते.

फळांची विरळणी : पाण्याच्या कमतरतेमुळे उन्हाळ्यात झाडांना लागणारे पाणी देणे शक्य होत नाही. झाडावरील फुले, फळे यांच्यामुळे झाडांना अतिरिक्त अन्नपाणी लागते. त्यामुळे उन्हाळ्यातील पाण्याची गरज भागवून झाडे जगवण्यासाठी उन्हाळी बहार न घेता झाडावरील फुले, फळे यांची विरळणी करावी.

शेततळ्यातील पाणी बचत : शेततळ्यातील एकूण जल साठ्यापैकी ४० ते ४२ % पाण्याचे बाष्पीभवन होते. मात्र हे होऊ नये यासाठी निंबोळी किंवा एरंडीच्या तेलाचा तवंग पाण्यावर पसरावा. ३० ते ३५ चौ. मी पाण्याच्या पृष्ठभागासाठी १ ली. तेलाची गरज भासते. बाष्पीभवन द्वारे होणारा पाण्याचा नाश कमी करून अधिकचे पाणी फळबागेसाठी वापरात घ्यावे.

# सहाय्यक आयुक्त यांची विविध निवडणुक कक्षांना भेट







बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्तच्यांवतीने सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन) डॉ. सीमा जगताप यांनी बीड जिल्ह्याच्या निवडणुकीविषयी विविध कक्षांना मंगळवारी सायंकाळी भेटी दिल्या.छत्रपती संभाजी नगर विभागीय आयुक्त यांच्या प्रतिनिधी म्हणून डॉक्टर सीमा जगताप यांचा बीड जिल्ह्यात दौरा होता. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीविषयी कामकाज करणाऱ्या विविध कक्षांना भेटी दिल्या.

अपर जिल्हाधिकारी श्री कुलकर्णी यांची भेट घेतली. डॉ. जगताप यांनी अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी त्यांच्या कक्षात भेट घेतली. यावेळी त्यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत ३९ बीड लोकसभा मतदार संघातील ईव्हीएम-व्हीव्हीपॅट कक्ष जो अपर जिल्हाधिकारी नियंत्रित करीत आहेत त्याची माहिती जाणून घेतली. बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅटची सरमिसळ झालेली असुन सहा विधानसभा मतदार संघाच्या स्ट्राँग रुम मध्ये पोहचविण्यात आले असल्याची माहिती श्री कुलकर्णी यांनी यावेळी दिली.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांच्या कक्षाला डॉ. जगताप यांनी भेट देऊन निवडणुकी विषयक आतापर्यंत झालेल्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. याप्रसंगी श्री कांबळे यांनी डॉ. जगताप यांना २०२४ ची संदर्भिका दिली.

उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांच्याकडून टपाली मतदानांतर्गत होणारे विविध वर्गातील मतदानाची प्रक्रिया सीमा जगताप यांनी त्यांच्या कक्षात जाऊन माहिती जाणून घेतली. एकही मतदाता सुटता कामा नये यासाठी ३९ बीड लोकसभा मतदार संघ सज्ज आहे.सर्व्हिस , दिव्यांग, वृद्ध, निवडणुकीसाठी विविध सेवेत रुजू असणारे मतदार या सर्वांची काळजी भारतीय निवडणूक आयोगाने घेतली असून प्रत्येकांचे मतदान व्हावे यासाठी जिल्हा निवडणुक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात प्रयत्न सुरू असल्याचे सूर्यवंशी यांनी यावेळी सांगितले.

३९ बीड लोकसभा मतदारसंघात दिव्यांग मतदारांना सुगम्य सुविधा, तसेच मतदान केंद्रावर अन्य सुविधा असाव्यात यासाठी छत्रपती संभाजी नगर येथील आयुक्त कार्यालयाच्यावतीने सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन) डॉक्टर सीमा जगताप यांनी मंगळवारी दौरा केला. सहाय्यक आयुक्त डॉक्टर जगताप यांनी माजलगाव, बीड, व गेवराई या तीन विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांचा पाहणी दौरा करून आढावा घेतला. या ठिकाणी दिव्यांगांना सुगम्य सुविधा आहेत का याची पाहणी केली यासह मतदान केंद्रावर आवश्यक सुविधांची पाहणी केली.

माजलगाव येथील दौऱ्या दरम्यान तहसीलदार वर्षा मनाळे या त्यांच्यासोबत होत्या. बीड तसेच गेवराई मतदान केंद्रात भेटी देऊन त्यांनी या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधांची पाहणी केली. यावेळी नायब तहसीलदार सुहास हजारे त्यांच्यासोबत होते. माजलगाव, बीड, गेवराई येथील मतदान केंद्राची पाहणी केल्यानंतर डॉक्टर सीमा जगताप यांनी समाधान व्यक्त केले.

## बीडमधील कार्यालयीन कामे कौतुकास्पद : सहाय्यक आयुक्त डॉ. सीमा जगताप

बीड : बीडमधील माध्यम संनियंत्रण व प्रमाणीकरण समिती(एमसीएमसी) आणि मीडिया कक्षाचे काम महिला अधिकारी तसेच कर्मचारी समर्थपणे पेलत आहेत, ही कौतुकास्पद असल्याची प्रशंसा सहाय्यक आयुक्त (विकास नियोजन ) डॉ.सीमा जगताप यांनी मंगळवारी सायंकाळी भेट देते वेळी केली. डॉ. सीमा जगताप यांनी आज बीड जिल्ह्यात निवडणुकीच्या अनुषंगाने तयार केलेल्या विविध कक्षांना भेट दिली. यावेळी त्यांनी एमसीएमसी व मीडिया कक्षाला ही भेट दिली. त्यावेळी त्या म्हणाल्या, निवडणुकीत माध्यमांचे काम अधिक जिकरीचे असते हे काम बीडमध्ये महिला अधिकारी व कर्मचारी करीत असल्याचे पाहून आनंद झाला असे ते यावेळी म्हणाल्या.

मीडिया कक्ष प्रमुख अंजू निमसरकर यांनी सहाय्यक आयुक्त जगताप यांना कक्षाची रचना तसेच मीडिया कक्षाचे दैनंदिन कामाची माहिती दिली. दैनिक वर्तमान पत्राच्या माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या बातम्यांचा अहवाल निवडणूक आयोग माहिती जनसंपर्क महासंचनालय तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी यांना दररोज दिला जात असल्याचे सांगितले. यासह पेड न्यूज बातम्यांवर या पक्षाची करडी नजर असते असेही सांगितले. तसेच विविध चॅनल्स प्रसारित करत असलेल्या राजकीय पेड जाहिरातीवरही निरीक्षण करत असल्याचे सांगितले.या कक्षात बहुसंख्य महिला असून अतिशय कार्यक्षमपणे त्या काम करीत असल्याचे कौतुकही श्रीमती जगताप यांनी यावेळी केले. यावेळी मीडिया कक्षाच्या प्रमुख अंजू निमसरकर यांच्यासह राजश्री आचार्य, प्रतिभा खाडे, छाया जिरे तसेच लता कारंडे या उपस्थित होत्या.

# अहिंसा प्रमोधर्म प्रेरणा देऊन महावीर जन्मोत्सव साजरा-ओस्तवाल



बीड । प्रतिनिधी

गुरु आनंद महिला प्रतिष्ठान ,बीड च्या वतीने काल दि.२१ रविवारी भगवान महावीर स्वामी जन्म कल्याण निमित्त गोरगरिबांना लापसी व खिचडी वाटून जिओ और जिने दो अहिंसा प्रमोधर्म प्रेरणा देऊन वस्तीवाड्यांवर तसेच झोपडपट्ट्यावर जैन धर्माचा प्रचार करून महावीर जन्मोत्सव साजरा केला या कार्यक्रमासाठी उपस्थित कपिलजी सोनवणे, पाटोळे सर ,भैय्या जोगदंड , सुजाता सावंत ,सविता ताइ जैन, कृष्णा भैया , शाहिद खान भैया ,रवि भैया ,थोरात मामा ,अजय भैया वंजारे,सुमेश भैया धन्वो,तन्मय भैया पवार,सुनिलजी चव्हाण,अमोलजी सागर ससाने, कपिल ढाकणे, तेजस सावंत , विशाल यांच्या उपस्थितीत जयंती साजरी करण्यात आली.

महावीर जयंती, ज्याला महावीर जन्म कल्याणक म्हणूनही ओळखले जाते, हा जैन समाजासाठी सर्वात महत्त्वाचा उत्सव आहे. जैन धर्माचे शेवटचे अध्यात्मिक गुरु भगवान महावीर यांच्या जन्मानिमित्त हा विशेष दिवस साजरा केला जातो. साधेपणाने साजरी केली जाणारी, महावीर जयंती ही जैन धर्मियांसाठी त्यांच्या धर्मगुरूंची शिकवण आणि गुण जाणून घेण्याची वेळ असते याचीच शिकवण म्हणून गुरू आनंद महिला प्रतिष्ठानमार्फत सीमा ओस्तवाल ह्या गोरगरीब लोकांसाठी उपक्रम राबवत असतात, सीमा ओस्तवाल गेल्या अनेक वर्षापासून गुरु आनंद महिला प्रतिष्ठान मार्फत गरिबांसाठी मदत करण्यासाठी अग्रेसर असतात. देशभरातील जैन समुदाय विविध विधी आणि परंपरांद्वारे त्यांच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी एकत्र येतात. रथयात्रा या दिवसातील मुख्य आकर्षणांपैकी एक आहे, जिथे भगवान महावीरांची मूर्ती रथावर नेली जाते. याव्यतिरिक्त, उत्सवाचा भाग म्हणून भक्त प्रार्थना करतात, उपवास करतात किंवा धर्मादाय कार्य करतात. लोक मंदिरांमध्ये श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि उत्सवांमध्ये सहभागी होतात. या शुभ दिवशी, या पवित्र दिवसाचा इतिहास आणि महत्त्व असतो मात्र सीमा ओस्तवाल यांनी गोरगरिबांना अन्नदान करून महावीर जयंती साजरी केली, अनेक गोरगरिबांच्या चेहेऱ्यावर हसू आणण्याचा प्रयत्न केला, लापसी व खिचडी झोपडपट्ट्यावर वाटप करून एक अनोखा उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला, यामुळे अनेक गोरगरिबांच्या वतीने सीमा ओस्तवाल यांचे आभार मानण्यात आले.

# शुक्रवारी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी

## महिलांसाठी तज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

मुळव्याधाच्या रुग्णांसाठी मुळव्याध तज्ज्ञ डॉ. अमोल खेत्रे यांनी बीडमध्ये मोफत मुळव्याध तपासणी शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरात पुणे, छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांची टिम पूर्णपणे मोफत तपासणी करणार आहे. विशेष म्हणजे महिलांच्या तपासणीसाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे. हे शिबीर बीड शहरातील जालना रोड येथील सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे शुक्रवार दि. २६ एप्रिल २०२४ रोजी होणार आहे. शिबीरातील रूग्णांना औषध उपचारातही सुट देण्यात येणार आहे.

मुळव्याध-भगंदर-फिशरचे लक्षणे आढळून आल्यास तत्काळ डॉक्टरांकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. तपासणी न केल्यामुळे मुळव्याध हा आजार वाढतच जातो. आणि त्याचे दुष्परिनाम भविष्यात रूग्णांना सहन करावे लागतात. सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल बीडच्या वतीने मुळव्याध- भगंदर-फिशरची मोफत तपासणी शुक्रवार दि. २६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत करण्यात आले आहे. बीड शहरातील जालना रोड येथील डी.सी. लोढा कॉम्लेक्स, मंत्री बँकेच्या शेजारी असलेल्या सुश्रुत मुळव्याध हॉस्पिटल येथे हे शिबीर आयोजीत करण्यात आले आहे. मुळव्याध-भगंदर-फिशर याचे लक्षणे मलप्रवृत्तीच्या वेळेस किंवा नंतर रक्त पडणे, शौच्याच्या जागेवर आजुबाजुला गाठ येणे, त्यामधून चिकट स्त्रव व रक्त येणे, शौचाच्या जागी आग होणे, वेदणा होणे, टोचल्यासारखे वाटणे, शौचाच्या वेळेस मांसल गोल आकाराचा भाग बाहेर येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याची तत्काळ तपासणी करुन त्यावर निदान करता येते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा आजार बळावतो.

त्यासाठी तपाणी करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. या हॉस्पिटलमध्ये गुदगत आजारांसाठी क्षारसुत्र, क्षारकर्म, आग्रिकर्म सुरक्षित आयुर्वेदिक उपचार पध्दती उपलब्ध आहेत. या शिबीरामध्ये फोनवरही नाव नोंदणी करण्याची सुविध्दा उपलब्ध करण्यात आलेली आहे.

# मनुर येथील अखंड हरिनाम सप्ताहाची भव्यदिव्य सांगता

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या मनुर येथील अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता मोठ्या दिमाकदार व भव्यदिव्य स्वरूपात काल झाली तालुक्यातील मौजे मनुर येथे मागच्या अनेक वर्षांपासून या अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन गाववकाऱ्यांच्या वतीने केले जाते या वर्षी ह भ प सोमेश्वर महाराज कर्डिले यांचे मार्गदर्शन लाभले सप्ताहाचे हे २० वे वर्ष आहे

दि १७ ते २३ एप्रिल दरम्यान या अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते या दरम्यान महाराष्ट्रातील अनेक नामवंत महाराजांचे कीर्तन या ठिकाणी झाली तर मनुर चे प्रसिद्ध कथाकार भागवताचार्य ह .भ.पा. सोमेश्वर महाराज कर्डिले यांच्या श्री मुखातून ही कथा ऐकताना भाविक भक्त अक्षरशः तल्लीन होऊन कथा श्रावण करत असत आज या कथेची सांगता झाली या वेळी गावातील महिला , मुली ,ग्रामस्थांनी पारंपरिक वस्त्र परिधान करून वाजत गाजत संपूर्ण गावातून ग्रंथ दिंडीत काढण्यात आली त्यानंतर श्री ह.भ. पा. नारायण महाराज काळे ( आळंदी देवाची) यांचे भव्य असे काल्याचे किर्तन संपन्न झाले व गावकऱ्यांच्या वतीने सामुदायिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# क्षेत्र नारायणगड नारळी सप्ताह वारकऱ्यांसाठी आरोग्य शिबिर



बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे श्री क्षेत्र नारायणगड संस्थान अखंड हरिनाम नारळी सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या ठिकाणी दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ शेकडो वारकरी बांधवांनी घेतला. हभप महंत श्री शिवाजी महाराज यांच्या उपस्थितीत या आरोग्य शिबिराची सुरूवात करण्यात आली. यावेळी डॉ पंकज घोडके यांनी आरोग्य सेवा जिओ जिंदगी अभियानाच्या वतीने दिली. यावेळी धनंजय गुंदेकर व रोहित लंबे यांनी या अभियानाचे नियोजन केले.

महंत श्री शिवाजी महाराज यांनी यावेळी जिओ जिंदगी अभियानाच्या आरोग्य सेवेचे कौतुक करत ही सेवा समाजाच्या हिताची असल्याचं यावेळी म्हंटले. या अभियानात रक्तदाब तपासणी, सुगर तपासणी करण्यात आली. २२ रक्तदाब, ५३ सुगर, जनरल ४६७ वारकरी, भाविक भक्तांना यावेळी मोफत औषधे, गोळ्या देण्यात आल्या. या अभियानासाठी अंस सर्जिकल, बीड यांनी औषधे दिली.

# जन्म बाईचा सोसन सोसन ओल्या पदराआड खोटं खोटं हसणं

## शिवार साहित्य संमेलनात रंगले कवी संमेलन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने आयोजित १५ व्या शिवार साहित्य संमेलनात मंगळवारी (दि.२३) कवी संमेलन चांगलेच रंगले . या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री प्रा. संगीता जाधव होत्या. गौरी देशमुख यांनी

जन्म बाईचा सोसन सोसन, ओल्या पदराआड खोटं खोटंच हसणं ही स्त्रियांची व्यथा सांगणारी कविता सादर केली. ज्ञानेश्वर गवते यांनी

कष्टात मरमर मरायची, शाळेला मला पाठवायची ही कविता सादर केली. खेलबा काळे यांनी ऐक ऐक मतदारा, ठेव लोकशाहीची जाण कर्तव्य तुझे हे भावा, चल करायला मतदान ही कविता सादर केली. आत्माराम कुटे यांनी भाव अंतरी रूजे शिवारी, पिके हे मोत्याचं चल झडकरी सखे साजणी, शेत माथ्याच ही कविता सादर केली. राही फपाळ यांनी वीरभूमीच्या शूरवीरांनो सलाम मातीला ही कविता सादर केली. प्रवीण काळे यांनी त्याच त्या भूतकाळाच्या पडद्यावर नकोस मेंदूला आपटू विचारांना चिकटलेले गृह बदल तुझ्या भावभावनांच पॅरामीटर बदल वेड्या ही कविता सादर केली. बा. सो. कांबळे यांनी विझणार नाही आता ही पेटलेली वात आहे, अंधार जळणारी मी क्रांतीची ज्योत आहे ही कविता सादर केली. स्मिता लिमगावकर यांनी आताशा मला समजते आहे काळीज तुटून तुटून जीवात जीव कुठे असतो ही कविता सादर केली. बालाप्रसाद चव्हाण यांनी बाया आपसात बोलायच्या आणि कौतुकही करायच्या नेहमीच, तिच्या वातीला एकसारखा पीळ देण्याच्या कौशल्याबाबत ही कविता सादर केली. याशिवाय गोविंद गोचडे, विठ्ठल चव्हाण, प्रतिभा थिगळे ,डॉ. मीनाक्षी निळेकर, डॉ. प्रज्ञा जोशी, दुर्गा राऊत, सिद्धार्थ तायडे, रानबा गायकवाड, सखाराम जोशी, प्रकाश पत्की, कैलास सोळंके, भगवान धरपडे, अनुराधा खुर्पे, पद्माकर कातारे, केरबा शिंदे, वैभव सोळंके, भारत सोळंके, विशाल वायाळ, शिवराम होके, प्रा. अशोक टोळे , संजय चव्हाण, आरती मारगुडे , दीपक पांढरे यांच्या कवितांना रसिकांनी भरभरून दाद दिली. कवी संमेलनाच्या अध्यक्षा प्रा. संगीता जाधव यांनी आयुष्याच्या या वळणावर, रोज नव्याने जन्मेन मी, सुखदुःखाचा सारीपाट रोज नव्याने खेळेन मी ही कविता सादर केली. तसेच या संपूर्ण कवी संमेलनाचा आपल्या अध्यक्षीय समारोपात आढावा घेतला . या कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन मोहन राठोड व प्रमोद काळे यांनी केले तर आभार वैभव सोळंके यांनी मांनले. यावेळी संमेलनाध्यक्ष अरूणकुमार साळवे, स्वागताध्यक्ष जगदीश पोपळे, मसापचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके, प्रा. स्नेहल पाठक, प्रा. डॉ.भाऊसाहेब राठोड, किशोर गुंजकर बालासाहेब झोडगे, प्रा. डॉ. उमेश साडेगावकर, प्रा. हिरामण डावरे, पद्माकर रुचके, राज गायकवाड, सोमेश पोपळे, रोमेश पोपळे, रामकिसन सोळंके अनुराधा पोपळे, डॉ. मोनिका पोपळे, डॉ. अजय डाके, सतीश सोळंके यांच्यासह साहित्यप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थित होती.




### ग्रंथ पूजन व ग्रंथ दिडी ने सुरुवात

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या पंधराव्या शिवार साहित्य संमेलनाची सुरुवात ना.धो.महानोर साहित्य नगरी फुले पिंपळगाव) मध्ये झाली. साहित्य संमेलनाचा उदेश हा ग्रामीण भागामध्ये साहित्य चळवळ रुजवण्याचा उपक्रम म्हणून या शिवार साहित्य संमेलनाची सुरुवात मागील १४ वर्षांपूर्वी केलेली आहे. या निमित्ताने प्रत्यक्ष शिवारावर जाऊन ग्रामीण भागात जे काही साहित्यिक असतील कवी असतील यांना त्यांचा हक्काचे व्यासपीठ मिळावं त्यांची जी प्रतिभा आहे ही सर्वांसमोर यावी, या उद्देशाने शिवार साहित्य संमेलनाची सुरुवात केलेली आहे. यावेळी ग्रंथाचे पूजन ह भ प रामराव महाराज फुलगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रंथ दिंडी मध्ये गाय,वासरू,घोड्याच्या सहभाने व उंटाच्या पाठीवरून ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली.

# दिव्यांग मतदाराच्या १००% मतदानासाठी नियोजन बैठक




बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये दि.१३ मे २०२४ रोजी लोकसभे साठी मतदान होणार असून.या मतदान प्रक्रियेमध्ये दिव्यांग असणाऱ्या मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून मा.जिल्हाधीकारी यांच्या आदेशाने जिल्हा समाजकल्याण कार्यालयामार्फत व जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्याच्या सहाय्याने दिव्यांग मतदार जनजाग्रती अभियान ही मोहीम राबवण्यात येत आहे.यासाठी मा.जिसक श्री.शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. यामध्ये तालुका निहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.


या मोहिमेद्वारे दिव्यांग असलेल्या मतदारांचा शोध घेण्यात येणार असून त्यांना त्यांच्या घरापासून ते मतदान केंद्रापर्यंत ने आण करण्यासाठी आवश्यक सहाय्यक साधने पुरवण्यात येणार आहेत.या कामासाठी गावातील आशा वर्कर, बी एल ओ यांची मदत घेण्यात येणार असून दिव्यांग शाळेतील कर्मचारी हे प्रत्येक दिव्यांगाच्या घरी जाऊन भेटी घेऊन त्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.तसेच प्रत्येक तालुकानिहाय जनजाग्रती फेरी काढण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगांचे १००% मतदान करून घेण्याच्या सूचना रवींद्र शिंदे यांनी केल्या आहेत.या कामासाठी दिव्यांग समाजिक संघटनानी मदत करण्याचे आवाहन ही करण्यात आले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

गुरुवार दि.२५ एप्रिल २०२४





# विदर्भातील पाच मतदारसंघात उद्या मतदान; प्रचाराच्या तोफा थंडावल्या

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यात लोकसभेच्या पहिल्या टप्प्यातील पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघातील मतदान आटोपले. आता दुसऱ्या टप्प्यात येत्या २६ एप्रिल रोजी पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा यवतमाळ- वाशिम आणि पूर्व विदर्भातील वर्धा अशा पाच लोकसभा मतदारसंघात लोकसभा निवडणूक होत आहे. बुधवारी (दि.२४) सायंकाळी निवडणूक प्रचार तोफा शांत झाल्यानंतर उमेदवार, पोल मॅनेजर्स मतांची बेरीज, वजाबाकीच्या गणितात गुंतले आहेत.



पश्चिम विदर्भात अमरावती, वर्धा यवतमाळ मतदारसंघासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तळेगाव येथे तर शेवटच्या दिवशी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची अमरावती जिल्ह्यातील मेळघाट आणि अकोला, अमरावतीत सभा झाल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची पावसाचा फटका बसलेली सभा लक्षवेधी ठरली. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा शरद पवार, केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आपचे नेते संजय सिंह, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याही ठिकठिकाणी सभा झाल्या. आ.राणा-आ.बच्चू कडू यांच्यातील सभेच्या मैदानावरूनचा वाद, यानंतर कडू यांना मैदान न मिळाल्याने त्यांनी रॅलीच्या माध्यमातून केलेले शक्तिप्रदर्शन लक्षवेधी ठरले.

यवतमाळ- वाशिम मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रॅलीद्वारे ही लढत प्रतिष्ठेची असल्याचे दाखवून दिले. एकीकडे पूर्व विदर्भात कडक उन्हाचा तडाखा, मतदारांची अनास्था यातून नागपूर, रामटेकसह पाच लोकसभा मतदारसंघात झालेल्या निवडणुकीत अपेक्षेपेक्षा कमी मतदान पाहायला मिळाले. आता पश्चिम विदर्भात अवकाळी पाऊस आणि कडक ऊन अशा वातावरणात होणाऱ्या निवडणुकीत किती टक्के मतदान होते आणि होणारे मतदान महाविकास आघाडी की महायुती कोणाचे पारडे जड ठरविणार हे येत्या ४ जूनला स्पष्ट होणार आहे.

निवडणूक होऊ घातलेल्या पाच लोकसभा मतदारसंघांचा विचार करता अमरावतीत विद्यमान खासदार नवनीत राणा यावेळी भाजपच्या उमेदवार असून विरोधात काँग्रेसचे आमदार बळवंत वानखेडे, प्रहारचे दिनेश बुब असा तर यवतमाळमध्ये महायुतीच्या राजश्री पाटील विरुद्ध मविआचे संजय देशमुख, वर्धा लोकसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान खासदार रामदास तडस, महाविकास आघाडीतर्फे शरद पवार गटाचे अमर काळे अशी लढत होत आहे. तर दुसरीकडे बुलढाणा मतदारसंघात विद्यमान शिवसेना खासदार प्रतापराव जाधव यांच्या विरोधात महाविकास आघाडीतर्फे नरेंद्र खेडेकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रविकांत तुपकर आणि वंचित बहुजन आघाडीचे वसंत मगर असा तर अकोला मतदारसंघात विद्यमान खासदार संजय धोत्रे यांचे सुपुत्र अनुप धोत्रे यांना भाजपने उमेदवारी दिली असून, त्यांच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर आणि काँग्रेसचे उमेदवार डॉ.अभय पाटील अशी लढत रंगणार आहे.

# निवडणूक काळात मराठा तरुणांवर तडीपारची कारवाई करणे निंदनीय व चुकीचे

## निवडणूक आयोगाकडे दाद मागणार - बजरंग सोनवणे

**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठा चळवळीमध्ये काम करणाऱ्या ज्या एका समूहाच्या तरुणांवर त्यांचे कोणतेही गुन्हेगारीचे रेकॉर्ड नसताना तडीपारची कारवाई केली जाते. हे निंदनीय व चुकीचे असून निवडणुक काळात अशा प्रकारची यापुढे कारवाई करू नये, जी कारवाई केली, ती थांबविली पाहिजे. या संदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार करून दाद मागणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी बाभळगाव घाट (ता. माजलगाव) येथे प्रचारादरम्यान बोलताना दिली.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे प्रचारासाठी माजलगाव तालुक्यात फिरत आहेत. तालुक्यातील बाभळगाव घाट येथे बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मराठा समाजाच्या २७ तरुणांवर त्यांनी मराठा आंदोलनात सहभाग घेतला. म्हणून जिल्हा प्रशासनाने तडीपारची कारवाई केली आहे. शासनाने आकस बुद्धीने आणि मराठा समाजाविषयी आकस म्हणून त्यांच्यावर तडीपारची कारवाई केलेली आहे. असा आरोप करीत निवडणुकीत दहशतीचे वातावरण करणे, या गोरगरीब तरुणांच्या घरावर दबाव देणे ही राजनीती तर नाही ना ? असा संशय व्यक्त करीत हे कोण करतंय, का करायला लावतंय असे प्रश्न उपस्थित केले. महाराष्ट्रात असे हजारो लोक आहेत, की ज्यांच्यावर अनेक गुन्हे असताना त्यांच्यावर तडीपारची कारवाई होत नाही. आमच्या या तरुणांवर का कारवाई केली जाते. यांच्यावर कोण दबाव टाकतय याची तक्रार निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचा उमेदवार म्हणून करणार असून दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर कारवाई झालेल्या तरुणांच्या पाठीशी उभा असून प्रसंगी वेळ पडली तर न्यायालयात देखील जाऊ अशी ग्वाही ही बजरंग सोनवणे यांनी दिली.

# नितीन गडकरींना भाषणादरम्यान भोवळ

**यवतमाळ । प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भरसभेत भाषणादरम्यान भोवळ आली. नितीन गडकरी भाषण करत असताना अचानक त्यांना भोवळ आली. त्यामुळे गडकरी यांचा तोल जाणार होता. तेवढ्यात स्टेजवरील लोकांनी आणि अंगरक्षकांनी नितीन गडकरी यांना सावरले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.



यवतमाळच्या पुसद येथील जाहीर सभेदरम्यान ही घटना घडली आहे. महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या सभेदरणात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भोवळ आली. यवतमाळमध्ये महायुतीच्या जाहीर सभेत भाषण सुरु असताना नितीन गडकरी यांना भोवळ आली. यावेळी उपस्थितांनी त्यांना सावरलं. आज राजश्री पाटील यांच्या प्रचारासाठी पुसदच्या शिवाजी ग्राऊंडवर महायुतीकडून जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत भाषणाला उभे राहिलेल्या गडकरींना भोवळ आली. यावेळी त्यांच्या अंगरक्षकाने आणि मंचावरील इतर उपस्थितांनी त्यांना सावरलं, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. यानंतर गडकरींना उपचारासाठी नेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

# बेरोजगारांसाठी येडेश्वरी सारखे आणखी युनिट उभे करू, त्यासाठी बजरंग बाप्पांना संसदेत पाठवा - सौरव सोनवणे

## बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ केज तालुक्यात कॉर्नर बैठका

**केज । प्रतिनिधी**

सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम उपलब्ध करून देण्यासाठी येडेश्वरी साखर कारखान्यासारखे इतर युनिट उभे करू. बेरोजगारांना स्वतःच्या पायावर उभे करू. त्यासाठी शेतकरी पुत्र बजरंग बाप्पा सोनवणे यांना मतदानरूपी आशीर्वाद देऊन संसदेत पाठवा. आवाहन युवानेते सौरव बजरंग सोनवणे यांनी केले. आम्ही आपले कधी ही विसरणार नाहीत अशी ग्वाही ही त्यांनी दिली.



राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ केज तालुक्यातील लव्हुरी, कोल्हेवाडी, तरनळी, साबला, धर्माळा या गावात कॉर्नर बैठका घेण्यात आल्या. यावेळी युवानेते सौरव सोनवणे हे बोलत होते. यावेळी शेकापचे भाई मोहन गुंड, मुन्ना चाळक, पिंटु मस्के, बप्पा डोंगरे बालाजी सोनवणे यांच्यासह तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी भाई मोहन गुंड म्हणाले की, या निवडणुकीत सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी वर्गामध्ये भाजपविरोधी खूप मोठा रोष निर्माण झाला आहे. गेल्या दहा वर्षापासून फक्त भांडवलदार पोसण्याचे काम या भाजपकडून होताना दिसत आहे. मात्र सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी वर्गाला वेठीस धरले आहे. पीकविमा, अतिवृष्टी अनुदान, फळबागाचे नुकसान अशा अनेक प्रश्नावर भाजप उदासीन आहे. बीड जिल्ह्यात सर्वाधिक आत्महत्या झाल्या असून बीडच्या खासदाराने दहा वर्षात चक्र शब्द काढला नाही. असा आरोप करीत इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांची निवडणूक सर्वसामान्य माणसाने हाती घेतली असून त्यांचा विजय कोणी रोखू शकत नाही. असा विश्वास भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केला.

# विधान परिषदेची कोकण पदवीधर निवडणूक काँग्रेस लढवणार –नाना पटोले यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी विधान परिषद कोकण पदवीधर मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचा उमेदवार दिला जाईल. मागील काही महिन्यांपासून काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी कोकण विभागात पदवीधर मतदारांची नाव नोंदणी करण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले आहे. राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, माकपासह इतर मित्रपक्ष यांची महाविकास आघाडी असून काँग्रेसचा उमेदवार निश्चित विजयी होईल असा विश्वास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला.



यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून काँग्रेस पक्षाचा उमेदवार उभा करावा यावर सर्व बाजूंनी विचार करण्यात आला. कोकण विभागातून काँग्रेस पक्षाचा उमेदवार द्यावा अशी आग्रही मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. भारतीय जनता पक्षाच्या सरकारला जनता कंटाळलेली असून भाजपा महायुतीला घरी बसवण्याचा निर्णय जनतेने केला आहे असेही सांगितले.

# अमेठीतून रॉबर्ट वाड्रा काँग्रेसचे उमेदवार?

**अमेठी । वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमधील अमेठी लोकसभा मतदारसंघातील राजकीय लढाईची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात काँग्रेस-सपाची आघाडी आहे. तर अमेठीची जागा काँग्रेसची असून अद्याप काँग्रेसने येथून आपला उमेदवार जाहीर केला नाही. दुसऱ्या टप्प्यातील मतदान २६ एप्रिल रोजी पार पडणार असून, त्यानंतर राहुल गांधी अमेठीचा दौरा करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. अशातच बुधवारी सकाळी अमेठीत नवे दृश्य पाहायला मिळाले. येथील गौरीगंज शहरासह काँग्रेस कार्यालयात एक पोस्टर लावण्यात आले आहे, ज्यामध्ये 'अमेठी की जनता करे पुकार रॉबर्ट वाड्रा अब की बार' अशा आशयाचा मजकूर लिहिण्यात आला आहे. गौरीगंज येथील काँग्रेस कार्यालयासह संपूर्ण शहरात हे पोस्टर्स लावण्यात आले आहेत. यामुळे काँग्रेस यावेळी रॉबर्ट यांना अमेठीतून निवडणूक रिंगणात उतरवणार अशी चर्चा सुरू झाली आहे.



काँग्रेस नेत्या प्रियंका गांधींचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी ४ एप्रिल रोजी एक विधान केले होते की, अमेठीच्या जनतेची इच्छा आहे की मी माझे राजकारणातले पहिले पाऊल अमेठीतून टाकावे आणि येथून खासदार व्हावे. कारण १९९९ च्या निवडणुकीत जेव्हा त्यांनी प्रियंकासोबत प्रचार केला तेव्हा तो फक्त अमेठीत होता. त्यावेळचे राजकारण वेगळे होते. वाड्रा यांच्या या वक्तव्यानंतर गौरीगंजमध्ये ठिकठिकाणी पोस्टर लावण्यात आल्याने राजकारण तापले आहे. याचे विशेष कारण म्हणजे एकेकाळी गांधी घराण्याचा गड मानल्या जाणाऱ्या अमेठीमध्ये २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसचे राहुल गांधी यांचा भाजपच्या स्मृती झुबिन इराणी यांनी ५५ हजार १२० मतांनी पराभव केला होता.

आता २०२४ च्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. अशा स्थितीत भाजपने येथून परत इराणी यांना उमेदवारी दिली आहे. तर काँग्रेसने अद्याप उमेदवार जाहीर केलेला नाही. यामुळे काँग्रेसच्या उमेदवाराची सर्वाधिक चर्चा सुरू आहे. आधी रॉबर्ट वाड्रा यांचे वक्तव्य आणि आता पोस्टर लावण्यामागचा अर्थ म्हणजे काँग्रेस यावेळी वाड्रा यांच्यावर डाव लावणार असेच स्पष्ट होत आहे. मात्र त्याची अधिकृत घोषणा अद्याप झाली नाही. दरम्यान, अमेठीतील जनता विद्यमान खासदार आणि केंद्रीय मंत्री इराणी यांच्यावर चांगलीच नाराज असून, अमेठीतील नागरिकांनी दिल्लीत गांधी कुटुंबाची भेट घेऊन येथून राहुल गांधी किंवा प्रियंका गांधी यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी केली होती. मात्र आता वाड्रा यांच्या एन्ट्रीमुळे भाजपच्या गोटात धाकधूक सुरू झाल्याचे राजकीय तज्ज्ञांनी सांगितले.

# पंकजाताई मुंडे यांच्यासाठी धोंडे समर्थकांची बीडमध्ये गर्दी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

बीड लोकसभा ३९ भारतीय जनता पार्टी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.भिमरावजी धोंडे व भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस युवा नेते अजय दादा धोंडे हे आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघातील शेकडो गाड्यांचा ताफा घेऊन बीडकडे दुपारी १२ वाजता रवाना झाले आहेत.



बीड लोकसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरू झाली असून भारतीय जनता पक्ष व महायुतीने भाजपा राष्ट्रीय सचिव मा.ग्रामविकास मंत्री यांना निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहे. भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा आज दि.२४ एप्रिल रोजी दुपारी नामनिर्देशन उमेदवार अर्ज दाखल करणार असून भव्य रॅली व विजयी संकल्प सभा पार पडणार असून यासाठी आष्टी तालुक्यातुन मा.आ.भिमरावजी धोंडे, युवा नेते अजय दादा धोंडे, धोंडे - पिता पुत्र हजारो कार्यकर्ते व तरुणांसह आष्टी तालुक्यातुन ५२९ तर पाटोदा व शिरुर तालुक्यातुन ३५० गाड्यांच्या ताफासह धोंडे पिता पुत्र पंकजाताई मुंडे यांची उमेदवारी दाखल करण्यासाठी रवाना झाले आहेत.निवडूक प्रक्रिया सुरू झाल्यापासून उमेदवारी मुंडे भगिनींना च मिळणार आहे.असा विश्वास व्यक्त करत मागिल २ ते ३ महिन्यांपासून धोंडे पिता-पुत्र पायाला भिंगरी बांधून गट गण व मतदार संघ पिंजून काढला आहे.लाखो की लीड से पंकजा मुंडे बीड से अशी टॅग लाईन देऊन धोंडे प्रचार करत आहेत.पंकजा मुंडे निवडून आणण्यासाठी धोंडे पिता पुत्र तन मन धन लावून तळमळीने काम करत आहेत.धोंडे यांनी हायटेक यंत्रणा कामाला लावली आहे.आज देखील हजारे कार्यकर्ते शेकडो गाड्यांच्या ताफ्यासह धोंडे पिता पुत्र बीडमध्ये दाखल झाले आहेत.

# आजच्या वंचितच्या विराट रॅलीमध्ये हजारोच्या संख्येने सहभागी व्हा -डॉ.सुनील कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे नेते अशोकराव हिंगे यांचा उमेदवारी अर्ज गुरुवार दि.२५ वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत भरण्यात येणार आहे हजारो कार्यकर्त्यांच्या विराट रॅली काढून लोकसभा निवडणुकीची उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अशोक हिंगे हे जिल्हाधिकारी कार्यालयात येणार आहेत. तरी वंचित व मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित चे पिंपळनेर सर्कल प्रमुख डॉ.सुनील कांबळे यांनी केले आहे वंचित पिंपळनेर प्रमुख डॉ. सुनील कांबळे म्हणाले अशोक हिंगे हे विक्रमी मतांनी विजयी होत संसदेत जाणार आहेत. देशाचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत अर्ज भरणार आहेत. बीड जिल्ह्याची सर्वसामान्य जनता लाखोच्या मताधिक्यानेअशोक हिंगे यांना विजयी करणार आहेत. अशोक हिंगे हे गुरुवारी बीड येथे भव्य अशी विजयी संकल्प रॅली काढून उमेदवारी अर्ज भरणार आहे यावेळी वंचित व मित्रपक्ष दिग्गज नेते पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत अशोक भाऊ हिंगे रॅलीत तसेच उमेदवारी अर्ज भरल्यानंतर विराट सभेला हजारो लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित पिंपळनेर सर्कल प्रमुख डॉ. सुनील कांबळे यांनी केले आहे.




# महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताने निवडून द्या-डॉ. सानप,सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

बुधवार, दिनांक २४/५/२०२४ रोजी शिरूर तालुका शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तालुका पदाधिकारी यांची बैठक सह संपर्कप्रमुख डॉ लक्षराज सानप, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक रतन गुजर उपजिल्हा प्रमुख अजीनाथ खेडकर, तालुका प्रमुख सोपान मोरे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली होती

या प्रसंगी बोलताना शिवसेना सह संपर्कप्रमुख डॉ लक्षराज सानप म्हणाले की पक्ष प्रमूख उध्दव ठाकरे साहेब हे मुख्यमंत्री असताना कोरोना सारख्या महामारीत कुटुंब प्रमुख म्हणून काम करून सर्व सामन्याचे जीव वाचवले राज्य प्रगत्ती करत असताना भाजपला पोटदुखी होत होती म्हणून त्यांनी उध्दव साहेबांचे सरकार गद्दार मिंदे सोबत स्थापन केले याचा आता ह्या निवडणुकीत बदला घेण्यासाठी महाविकास आघडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना निवडून आणा



या वेळी मार्गदर्शन करताना शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की ही लोकसभा निवडणुक देशातील मोदी, शहा, यांची हुकूमशाही गाडून टाकण्याची आहे ४०० पारचा नारा देणारे मोदी शहा यांच्या पाया खालची वाळू सरकली आहे त्यांच्या १५० पण जागा येणार नाहीत हे लक्षात आल्यावर त्यांची ऐक ऐक जागे साठी मर मर सुरू आहे साम दाम दंड भेद ही नीती वापरून कशाही परिस्थितीत निवडणुक जिंकायची असा अटटाहास सुरू आहे पण देशातील राज्यातील जनता महागाई, बेरोजगारी भाजप च्या खोट्या बोलण्याला त्रस्थ झालेली आहे त्यामुळे जनतेनेच ही निवडणूक हातात घेतली असून त्यांचा पराभव निश्चित आहे बळीराजाला देशोधडीला लावणाऱ्या ह्या सरकार च्या विरोधात मतदान करून महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताने निवडून आणा

या बैठकीस राजेश कोकने, शशी सानप, तय्यब पठाण, शेख कलीम, रमाकांत मावस्कर, नामदेव आघाव, संदीप शिंदे, हरिभाऊ मोरे, संजय सानप, भीमा शिंदे, सखाराम सातपुते, बाळासाहेब घुगे, विठल लाटे, शेख लाला इत्यादी तालुक्यातून असंख्य पदाधिकारी, लोकप्रतिनिधी शिवसैनिक उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# कोयत्याने वार करुन महावितरणच्या महिला कर्मचाऱ्याला संपवलं, ५७० रुपयाच्या बिलासाठी १ वर्षाचं बाळ पोरकं झालं!

**बारामती । प्रतिनिधी**

वीजबिल जास्त का आलं म्हणून जाब विचारण्यासाठी आलेल्या एका विकृत मानसिकतेच्या तरुणाने एका ३४ वर्षीय महिला वीज कर्मचाऱ्यावर कोयत्याने वार करुन संपवल्याची घटना घडली आहे. बारामतीतील मोरगाव येथे बुधवारी सकाळी ११.१५ वाजेच्या सुमारास ही घटना घडली आहे. मन पिळवटून टाकणाऱ्या या घटनेत एका महिला कर्मचाऱ्याचा हकनाक बळी गेला आहे. ५७० रुपयाच्या बिलासाठी आईची हकनाक हत्या झाल्याने एक वर्षाचं बाळ पोरकं झालं आहे.



मुळच्या लातूर शहरातील रहिवाशी असलेल्या सौ. रिंकू गोविंदराव बनसोडे ह्या दहा वर्षापूर्वी २०१३ मध्ये महावितरणच्या सेवेत दाखल झाल्या होत्या. गेल्या १० वर्षापासून त्या मोरगाव येथेच कार्यरत होत्या. नोकरीनंतर रिंकू बनसोडे यांचा विवाह झाला. त्यांना एक वर्षाचा मुलगा आहे. दहा दिवसांची सुटी संपल्यानंतर त्या मोरगाव कार्यालयात कामावर रुजू झाल्या. बुधवारी २४ एप्रिल रोजी सकाळी ११.१५ च्या सुमारास रिंकू बनसोडे या मोरेगाव येथील कार्यालयात एकट्याच होत्या. यादरम्यान जणू काळ बनून हल्ला करण्यासाठी संपूर्ण तयारीनिशी आलेल्या अभिजीत पोटे या व्यक्तीने रिंकू यांना वीजबील जास्त आल्याचा जाब विचारला. या विकृत मानसिकतेच्या व्यक्तीने रिंकू यांच्या हातापायावर तोंडावर एकामागोमाग एक असे जवळपास १६ वार केले. काही कळायच्या आतच रिंकू रक्ताच्या थारोळ्यात पडल्या. रिंकू यांना मोरगाव येथे प्रथमोपचार केल्यावर त्यांना तातडीने पुण्यातील सह्याद्री रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केलं. पण दुर्दैवाने उपचारादरम्यान त्यांचे दुपारी ३ वाजेच्या सुमारास मृत्यू झाला. रिंकू बनसोडे यांच्या मृत्यूने महावितरणमधील कर्मचाऱ्यांवर शोककळा पसरली आहे. या घटनेचा कर्मचाऱ्यांसह सर्वच स्तरातून निषेध केला जात आहे. हल्ला केलेल्या आरोपीचं वीजबिल रत्नाबाई सोपान पोटे या नावाने आहे. त्या वीजबिलाचा ग्राहक क्रमांक १८६६४००५३५४९ असा असून, चालू एप्रिल २०२४ या महिन्याचे ६३ युनीट वीजवापराचे वीजबिल ५७० रुपये इतके आहे. मागील १२ महिन्याचा वापर तपासला असता तो ४० ते ७० युनिटमध्ये आहे. थकबाकी नाही, उन्हाचा तडाखा वाढल्यामुळे चालू महिन्यात वापर ३० युनीटने वाढला व त्याचे बील ५७० आले होते. हे बील वापरानुसार व नवीन दरानुसार योग्यच आहे. तसेच सदर ग्राहकाची वीजबिलाबाबत कोणतीही लेखी अथवा ऑनलाईन तक्रार नोंदवलेली नाही.

# संपत्तीसाठी पोटच्या पोराच्या हत्येची सुपारी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात गुन्हेगारी चांगलीच वाढत आहे. त्यात गोळीबारांच्या घटनेतदेखील मागील काही दिवसांपासून वाढ झाली आहे. त्यातच १६ एप्रिलला पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावर गोळीबार झाला होता. याच गोळीबार प्रकरणाचा पुणे पोलिसांनी छडा लावला आहे. वडिलांनीच मुलाच्या हत्येची ५० लाख रुपयांची सुपारी दिली असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. संपत्तीच्या वादातून वडिलांनी सुपारी दिल्याचं देखील समोर आलं आहे. या प्रकरणी वडिलांसह ६ जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

धीरज दिनेशचंद्र आरगडे या बांधकाम व्यवसायिकावर २ जणांनी गोळीबाराचा प्रयत्न केला होता. याघटनेचा सीसीटीव्हीदेखील व्हायरल झाला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुलाला मारण्यासाठी एकूण ५० लाखांची सुपारी दिली होती. त्यातले २५ लाख रुपये दिले होते आणि २५ लाख देणे शिल्लक होते.

मिळालेल्या माहितीनुसार, १६ एप्रिल रोजी पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावरील अरगडे हाईट्स जवळ दुपारी ही घटना घडली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात धीरज दिनेशचंद्र अरगडे यांनी तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला होता.

अरगडे त्यांच्या कार्यालयात आले. काम संपवून ते दुपारी ३ वाजता घरी जाण्यासाठी कार्यालयातून बाहेर पडले. असता त्या वेळी दुचाकीवरून दोघे जण त्याठिकाणी आले. त्यांनी अरगडे यांच्या गाडीजवळ दुचाकी लावली. दुचाकीवरील सहप्रवाशाने पिस्तूल काढून गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, ऐनवेळी पिस्तूल लॉक झाली आणि त्यामुळे त्यांचा डाव फसला. अरगडे यांनी आरडाओरडा केल्याने हल्लेखोर दुचाकीवरून पळून गेले. या संपूर्ण घटनेचा तपास पोलिसांनी केला असता वडिलांनीच संपत्तीच्या वादातून मुलाला जीवे मारण्याचा प्लॅन केला असल्याचे निष्पन्न झाले असून याप्रकरणी ६ जणांना अटक केली आहे.

आपल्याच मुलाच्या हत्येची सुपारी दिल्याच्या या घटनेनं चांगलंच आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. त्यात गोळीबाराचा कट रचून मुलाच्या हत्येचा कट रचला मात्र तो फसल्याने वडिलांचं पितळ उघडं पडलं. त्यामुळे कुटुंबियांकडूनही संताप व्यक्त केला जात आहे.

# पारगावात आढळला मृतावस्थेतील बछडा

**पारगाव । प्रतिनिधी**

पारगाव येथील चिचगाई मळ्यातील भागचंद ढोबळे यांच्या उसाच्या शेतात बिबट्याचा बछडा मृतावस्थेत आढळून आला.

पारगाव (ता. आंबेगाव) येथील सचिन कोंडीभाऊ ढोबळे हे बुधवारी (ता. २४) सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास शेतात पाणी भरण्यासाठी गेले असता त्यांना भागचंद ढोबळे यांच्या शेतात बिबट्याचा बछडा मृतावस्थेत पडलेला दिसला. त्यांनी याची माहिती माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांना दिली. त्यांनी वनविभागाला माहिती कळविल्यानंतर वनरक्षक साईमाला गित्ते, वनविभागाच्या रेस्कू टिम सदस्य, विठ्ठल ढोबळे, बजरंग देवडे, सचिन ढोबळे, अविनाश ढोबळे यांनी घटनास्थळी भेट दिली. बछडा साधारण दोन ते तीन महिन्यांचा असावा. दोन बछड्यांच्या झुंजीत त्याचा मृत्यू झाला असावा. त्यानंतर तरस किंवा अन्य प्राण्याने त्याला खाल्ले असावे. पशुवैद्यकाने शवविच्छेदन केल्यानंतर मृत्यूचे निश्चित कारण समजेल, असे मंचर वनपरीक्षेत्र अधिकारी स्मिता राजहंस यांनी सांगितले.

# केंद्रातील सरकार बदलणार, काळ्या दगडावरची पांढरी रेघ-अमोल कोल्हे

**पुणे । प्रतिनिधी**

शिरुर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे (-ोश्र घेश्रहश) सातत्याने विरोधकांवर निशाणा साधताना दिसत आहे. शेककऱ्यांच्या प्रश्नावरुन तर कधी सरकारच्या धोरणावरुन त्यांच्यावर टीका करतात. केंद्रातील मोदी सरकार जाऊन नवीन सरकार येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे, असा दावा अमोल कोल्हे यांनी केला आहे. पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची नुकतीच मोशी येथे बैठक पार पडली. या बैठकीत बोलताना त्यांनी हा दावा केला आहे.




अमोल कोल्हे म्हणाले की, देशामध्ये सर्वाधिक जागा काँगेस लढत आहे, देशातील वारं बदललं आहे. भाजप सरकारने महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांची दैना करून ठेवल्यामुळे देशातील जनता भाजपच्या सरकारवर नाराज आहे. केंद्रात इंडिया आघाडीचे वारे वाहू लागले आहे. केंद्रातील मोदी सरकार जाऊन नवीन सरकार येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे. असं म्हणत कोल्हे यांनी केंद्रातील सरकार बदलणार असल्याचे सूतोवाच केले आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले, प्रियांका गांधी आणि राहुल गांधी या बहीण भावाकडे हा देश संघर्षाचे प्रतीक म्हणून बघत आहे. एकदा दिल्लीतील एक मोठे नेते सांगत होते की, काँग्रेस ही आजगरासारखी प्रचंड अवाढव्य आहे, पण ती सुस्त आहे असं वाटत राहतं, तसं आजगराकडे पाहिलं की वाटतं आजगर सुस्त आहे, पण तोच आजगर भुकेलेला असतो आणि त्याला भक्ष्य दिसतं तेव्हा आजगराऐवढी ताकद इतर कोणत्याही प्राण्यात नसते. अगदी तसं काँग्रेस असल्याचं आहे. असे यावेळी अमोल कोल्हे यांनी सांगितले.

देश पातळीवरची निवडणूक असली तरी विरोधकांकडे प्रचाराचे मुद्दे नाहीत. म्हणून ते वैयक्तिक पातळीवर येऊन टीका करत आहेत. विरोधी उमेदवार सुरवातीला म्हणाले, २०१९ चा बदला घेण्यासाठी निवडणूक लढवायची, आता वारं बदललं हे लक्षात आल्यावर म्हणतात माझी शेवटची निवडणूक आहे. पण कोणाची पहिली निवडणूक असो किंवा शेवटची. त्याने आपले प्रश्न सुटणार नाहीत. महागाई कमी होणार नाही, की हाताला काम मिळणार नाही. याचाही विचार मतदारांनी करावा, असेही कोल्हे म्हणाले.

# स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

प्रवेश शुल्क स्वीकारल्यानंतर कोणतीही पूर्वसूचना न देता स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र बंद केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केंद्रात अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी केंद्र चालकासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणी 'थिंक ण्ड लर्न कोचिंग क्लास'चे संचालक सैफ अली शेख (वय ३२, रा. बीड), व्यवस्थापक गोविंद राठोड (वय ३०, रा. मध्यप्रदेश) यांच्यावर चतु:शृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विद्यार्थ्याने याबाबत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार विद्यार्थी हा राजगुरुनगर परिसरात राहायला आहे. गेल्या काही महिन्यांपासून तो स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. त्याने थिंक ण्ड लर्न स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवेश घेतला. त्याने वर्षभरासाठी ५६ हजार शुल्क भरले. तसेच मार्गदर्शन केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबतची माहिती घेतली. शुल्क भरल्यानंतर तीन महिने मार्गदर्शन केंद्र सुरू राहिले. शैक्षणिक सुविधा दिल्या नाहीत म्हणून विचारणा केली असता तक्रारदार तरुणाला शिवीगाळ करण्यात आली. त्याने चौकशी केल्यानंतर अन्य विद्यार्थ्यांची फसवणूक करण्यात आल्याचे उघडकीस आले.स्पर्धा परीक्षा केंद्र चालकाने काही विद्यार्थ्यांची तीन लाख ५१ हजारांची फसवणूक केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. सहायक पोलिस निरीक्षक सुजाता शामने तपास करत आहेत.

# आईच्या शस्त्रक्रियेसाठी शेजाऱ्याच्या घरात चोरी; सात लाखांचे दागिने जप्त, एकास अटक

**पुणे । प्रतिनिधी**

आईच्या शस्त्रक्रियेला लागणाऱ्या पैशांसाठी एकाने शेजाऱ्यांचे बंद घर फोडून दागिने आणि रोकड चोरल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. चोरी करणाऱ्यांकडून पोलिसांनी सव्वा सात लाखांचे दागिने जप्त केले आहे. गुन्हा घडल्यानंतर आठ महिन्यांनी चोरीचा छडा लागला आहे.




या प्रकरणी पोलिसांनी दीपक नामदेव पाटोळे (वय ४१) याला अटक केली आहे. चोरी झाल्यानंतर बिबवेवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा करण्यात आला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपक बेरोजगार आहे.

तो आणि त्याची वृद्ध आई बिबवेवाडीतील एका सोसायटीत राहायला आहेत. गेल्या काही महिन्यांपासून त्याची आर्थिक चणचण सुरू होती. तर आई आजारी असल्याने त्यांची शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता.

आर्थिक चणचण दूर करीत आईच्या उपचारांसाठी त्याने गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात शेजाऱ्यांच्या बंद सदनिकेचे कुलूप तोडले व तेथून दागिने आणि रोकड चोरली होती. शेजारी मूळगावी सोलापूरला गेले असल्याचा फायदा घेत त्याने चोरी केली होती. शेजारी गावाहून परत आल्यानंतर घरफोडीचा प्रकार उघडकीस आला होता.

चोराचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले होते. गेले सहा महिने गुन्ह्याचा छडा लागला नव्हता. मात्र पोलिस तपासात मिळालेल्या माहितीनुसार, पाटोळेने शेजाऱ्यांच्या घरात चोरी केल्याचे उघडकीस आले. बिबवेवाडी पोलिस ठाण्याचे सहायक निरीक्षक प्रवीण काळुखे, संतोष जाधव, विशाल जाधव, आशिष गायकवाड, शिवाजी येवले, प्रणय पाटील, ज्योतिष काळे आणि अभिषेक धुमाळ यांनी ही कामगिरी केली.

# पुणे पोलिसांचा मुळशी पॅटर्न; कुरव्यात गुंड नव्याचा सिनेस्टाईल थरार, पाठलाग करुन अटक

**पुणे । प्रतिनिधी**



पोलीस आणि गुन्हेगारांची नेहमीच चकमक होत असते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून गुन्हेगारी वाढत असलेल्या पुणे जिल्ह्यात पोलीस व गुन्हेगाराचा सिनेस्टाईल थरार पाहायला मिळाला आहे. पुणे जिल्ह्यातील मुठा गावात पोलीस आणि गुन्हेगारात पाठलाग झाल्याची घटना घडली. त्यानंतर, अखेर नव्या उर्फ नवनाथ निलेश वाडकर (वय १८) या कुख्यात गुंडाला पोलिसांनी अटक केली. नवनाथ वाडकर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर खंडणी, खुनाचा प्रयत्न याबाबतचे गुन्हे दाखल आहेत. गेल्या काही दिवसांपासून तो फरार होता. अखेर, पोलिसांनी नव्याला अटक केली आहे.

नवनाथसाठी गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस पथकं मागावर होती. नव्या वाडकर हा मुळशी तालुक्यातील मुठा परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर गुन्हे शाखेचे खंडणीविरोधी पथक त्याला पकडण्यासाठी गेले असता त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केल्याने सिनेस्टाईल थरार मुळशीमध्ये पाहायला मिळाल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. विशेष म्हणजे पोलीस पाठलाग सुरू असतानाच वाडकरने पोलिसांच्या दिशेने एक गोळी झाडली. त्यानंतर, पोलिसांनीही स्वसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल वाडकरच्या दिशेने तीन गोळ्या झाडल्या. या चकमकीच्या सहाय्याने त्याने पळून जाण्याच्या प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले

पुण्यातील २००७ मध्ये पर्वती भागात जनता वसाहतीत निलेश वाडकर आणि सनी चव्हाण उर्फ चॉकलेट सुन्या यांच्या गुन्हेगारी टोळ्या होत्या. कधीकाळी वाडकर हा सनी चव्हाणचा एकदम खास मानला जायचा. मात्र काही दिवसांनी त्यांच्यात खटके उडाले आणि वाडकरने स्वतःची टोळी तयार केली. काही वर्षांपूर्वी गोळीबार केल्याच्या प्रकरणात निलेश वाडकर याला अटक झाली होती. तुरुंगातून सुटून आल्यानंतर वाडकर याचा सनीने खून झाला. या गुन्ह्यात फरार असलेल्या सनी याला पोलिसांनी अटक केली. तेव्हापासून निलेश वाडकर याचा मुलगा असलेल्या नव्या उर्फ नवनाथ वाडकर याने जनता वसाहत परिसरात वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली होती. या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या घटनांमधून स्थानिक गुंडगिरी वाढली होती. त्यामुळे, फरार असलेल्या नव्याला अटक करण्यात पोलिसांना अखेर यश आले.

# जमिनीच्या वादातून मित्रानेच केला मित्राचा खून ! कोंढवा पोलिसांकडून काही तासात आरोपी गजाआड, आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक

**पुणे । प्रतिनिधी**

इमारतीच्या कामावर सुपरवायझर म्हणून काम करणाऱ्या एका व्यक्तीचा चाकूने भोसकून खून करत त्याला इमारतीवरुन खाली फेकून दिल्याचा प्रकार कोंढवा परिसरातील रहेजा स्टर्लिंग सोसायटीच्या क्लाऊड नाईन जवळ घडला होता. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी २४ तासात दोन आरोपींना अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे. गुन्ह्यातील मुख्य आरोपीला उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आली आहे. जमिनीच्या वादातून गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

पंकज कुमार मोती कश्यप (वय-३५ रा. कृष्णानगर, गल्ली नंबर २, मोहमदवाडी) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी राज उर्फ सुरेश मनीराम आर्या (वय-३४ सध्या रा. महंमदवाडी, पुणे मुळ रा. उत्तर प्रदेश), भोलेनाथ राजाराम आर्या (वय-२६ सध्या रहेजा व्हिस्टा लेबर कॅम्प पुणे मुळ रा. उत्तर प्रदेश) असे अटक केलेल्या आरोपींचे नाव आहे. याबाबत पंकज यांची पत्नी मीनाकुमारी पंकज कश्यप (वय-३०) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार मंगळवारी (दि.१६) रात्री आठ ते साडे आठ दरम्यान घडला.

दाखल गुन्ह्याचा तांत्रिक तपास करत असताना मयत पंकज याला घटनास्थळी बोलावून घेतल्याचे निष्पन्न झाले. पंकज याला बोलावून घेणाऱ्या संशयीतापैकी राज उर्फ सुरेश आर्या हा खुनाच्या रात्रीच काही मजुरांसमवेत उत्तर प्रदेशात पळून गेल्याचे समजले. त्यानंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी एक पथक उत्तर प्रदेशात रवाना करण्यात आले.




मजुरांकडे केलेल्या चौकशी दरम्यान व नातेवाईकांचा शोध घेवून पकंज हा आरोपी राज उर्फ सुरेश आर्या यांच्यासोबत पुर्वी काम करित असताना दोघांनी मिळून मुळगावी उत्तरप्रदेशात एकत्रित जमीन खरेदी केली आहे. ती जमीन मयत पंकज याच्या नावावर असून ती जमीन सुरेश याच्या नावावर करुन देण्यास विरोध करत होता. यावरून त्यांच्यात वाद झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांच्या पथकाने बांधकाम साईटच्या बाहेरील रोडवरील ४२ सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता आरोपी याच्या सोबत त्याचा नातेवाईक (दाजी) भोलाराम राजाराम आर्या याचा शोध घेत असताना तो पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी लेबर कॅम्पमध्ये थांबल्याचे समजले. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता पंकज याचा खून आरोपी सुरेश याच्या सोबत केल्याचे कबुल केले. तसेच सुरेश हा त्याच्या मुळगावी घोरमा परसिया उत्तर प्रदेश येथे पळून गेल्याचे सांगितले. त्यानुसार पथकाने उत्तर प्रदेशात जाऊन सुरेश याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे करीत आहेत.

ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग मनोज पाटील, पोलीस उपायुक्त आर राजा, सहायक पोलीस आयुक्त गणेश इंगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक गुन्हे मानसिंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे, पोलीस उपनिरीक्षक बालाजी डिंगोळे, पोलीस अंमलदार अमोल हिरवे, निलेश देसाई, शाहिद शेख, लक्ष्मण होळकर, अभिजीत जाधव, संतोष बनसुडे, गणेश चिंचकर, राहुल रासगे, अक्षय शेंडगे, जयदेव भोसल, विकास मरगळे, शशांक खाडे, रोहित पाटील, राहुल थोरात, अभिजीत रत्नपारखी, सुरज शुक्ला, सुजित मदन यांच्या पथकाने केली.

# पार्थच्या सुरक्षेसाठी रणागाडा द्यायला पाहिजे होता, तो मोठा नेता- रोहित पवारांचा तीव्र संताप

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे आणि महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यातील लढत आता रंगत चालली आहे. दोन्ही उमेदवारांचा पक्षांकडून जोरदार प्रचार सुरु असताना आता आणखीन एका विषयावरून वाद पाहायला मिळत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोठे चिरंजीव पार्थ पवार यांना वाय प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. त्यावरुन, पवार कुटुंबातील सुप्रिया सुळेंच्या मैदानात उतरलेल्या सदस्यांनी पार्थ पवार यांना देण्यात आलेल्या वाय प्लस सुरक्षेवरुन तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. आमदार रोहित पवार यांनी तर, पार्थ पवार हे मोठे नेते आहेत, त्यांच्या सुरक्षेसाठी रणागाडा द्यायला पाहिजे होता, असे म्हटले आहे.



पार्थ पवार यांना वाय प्लस सुरक्षा देण्यात आल्यानंतर आता आमदार रोहित पवार आणि युगेंद्र पवार यांनाही सुरक्षा देण्याची मागणी होत आहे. रोहित आणि युगेंद्र यांच्या सुरक्षिततेत वाढ करावी, अशी मागणी थेट खासदार सुप्रिया सुळेंकडून करण्यात आली आहे. पार्थ पवार अजित पवारांचे मोठे चिरंजीव असून त्यांच्याकडे सध्या कुठलेही राजकीय पद .नाही, लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने गेल्या अनेक दिवसांपासून ते आई सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. गतवर्षी लोकसभा निवडणुकांमध्ये उमेदवार असलेले पार्थ यंदा प्रचारात दिसून येत आहेत. विशेष म्हणजे गतनिवडणुकीत ज्यांनी पार्थ यांचा पराभव केला, त्याच श्रीरंग बारणेंच्या उमेदवारी अर्जासाठी यंदा पार्थ यांचे वडिल अजित पवार उपस्थित होते. त्यामुळे, राजकारण कुठल्या वळणावर गेलंय, याचीच चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. त्यातच, अजित पवारांचे दोन्ही चिरंजीव प्रचाराच्या रणधुमाळीत उतरले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पार्थ पवार यांना वायझेड सुरक्षा देण्यात आल्याचा मुद्दा वादग्रस्त ठरत आहे. आमदार रोहित पवार यांनी थेट सागर बंगल्याचा उल्लेख करत, पार्थ यांच्या वाय प्लस सुरक्षेवरुन बोचरी व उपहासात्मक टीका केली आहे.